दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३१० I सोमवार २४ ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## ‘मनात पक्कं ठरवलं तर मुख्यमंत्री बनू शकता’



**नागपूर :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नागपुरात ‘जेन झी’ पिढीशी संवाद साधला. ‘मंथन फॉर युवा’च्या कार्यक्रमात तरुणांनी त्यांना राजकारणाची निवड आणि मुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीचा दबाव याबाबत प्रश्न विचारले. यावर फडणवीस म्हणाले की, भारताच्या संविधानाने आणि लोकशाहीने प्रत्येकाला मोठी संधी दिली आहे. ज्याने कधी नगरसेवक होण्याचाही विचार केला नव्हता, तो मुख्यमंत्री झाला. गुजरातच्या रेल्वे स्थानकावर चहा विकणारा मुलगा देशाचा पंतप्रधान झाला. ही संविधान, लोकशाही आणि युवाशक्तीची ताकद आहे, असे त्यांनी सांगितले.राजकारणात आल्यानंतर मुख्यमंत्री होण्याचा विचार कधी केला नव्हता, असे सांगत फडणवीस म्हणाले की, सुरुवातीला केवळ विचारांनी प्रेरित होऊन काम केले. पायरी-पायरीने जबाबदाऱ्या मिळत गेल्या आणि जनतेच्या विश्वासामुळे मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचलो. मनात पक्के ठरवले तर लोकशाही आणि संविधान कोणालाही मुख्यमंत्री बनण्याची संधी देऊ शकते, असा विश्वास त्यांनी तरुणांना दिला.

# २०२९ मध्येच ‘एक देश, एक निवडणूक’ची चाचपणी?

### एनडीएशासित राज्यांत लोकसभेसोबत विधानसभा निवडणुका घेण्याचा भाजपचा विचार
### २२ राज्यात मुदतपूर्व विधानसभा निवडणुका? २०३४ पूर्वीच राजकीय प्रयोगाची शक्यता

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** देशात गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या ‘एक देश, एक निवडणूक’ संकल्पनेला आता मूर्त स्वरूप देण्याच्या हालचालींना वेग आला आहे. संबंधित विधेयकांवर संसदेची संयुक्त समिती काम करत असून, हिवाळी अधिवेशनात समितीचा अहवाल सादर होण्याची शक्यता आहे. विधेयक मंजूर झाले तरी देशभरात एकत्रित निवडणुका घेण्यासाठी २०३४पर्यंत प्रतीक्षा करावी लागू शकते. मात्र, भाजपकडून त्याआधीच २०२९मध्ये हा प्रयोग करण्याची चाचपणी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

संपूर्ण देशाऐवजी केवळ एनडीएशासित राज्यांमध्ये लोकसभेसोबत विधानसभा निवडणुका घेण्याचा पर्याय तपासला जात आहे. २०२९च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी एनडीएच्या सत्तेतील २२ राज्यांपैकी ११ राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणे अपेक्षित आहे. तर आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम आणि ओडिशा या चार राज्यांत लोकसभेसोबतच विधानसभा निवडणुका होतात. एनडीएची सर्व २२ राज्यांतील सत्ता कायम राहिल्यास जानेवारी २०२९मध्ये या राज्यांच्या विधानसभा मुदतपूर्व बरखास्त करण्याचा पर्याय वापरला जाऊ शकतो. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या शिफारशीनुसार राज्यपाल विधानसभा बरखास्त करू शकतात. त्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाला सहा महिन्यांच्या आत निवडणुका **(पान ४ वर)**



# २२ फुटांची भुलेश्वर राजा गणेशमूर्ती कोसळली



## आनंदाच्या आगमन सोहळ्याला गालबोट: दोघांचा मृत्यू, पाच जखमी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** भुलेश्वर परिसरात शनिवारी (दि. २२) रात्री गणेशमूर्तींच्या आगमन मिरवणुकीदरम्यान २२ फूट उंच ‘भुलेश्वरचा राजा’ गणेशमूर्ती अचानक कोसळल्याने झालेल्या भीषण दुर्घटनेत दोघांचा मृत्यू, तर पाच जण जखमी झाले. जय आंबे चौकात रात्री सुमारे दहाच्या सुमारास ही घटना घडली. मूर्ती कोसळताच घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. अग्निशमन दल, पोलीस, रुग्णवाहिका आणि महापालिकेच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.

या दुर्घटनेत संकेत नेवशे (३३) आणि ब्रिजेश हेमंत जोशी (३०) यांचा मृत्यू झाला. तर वैभव घेनंद (३८), पवन चौरसिया (२५), लावण्या गनेर (५), दिव्या गनेर (७) आणि कुणाल काशिद (२६) हे जखमी झाले. सर्व जखमींवर जवळच्या रुग्णालयांत उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मूर्तीच्या नट-बोल्टमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचा तसेच मूर्ती वाहून नेणाऱ्या ट्रॉलीचे **(पान ४ वर)**

**दुर्घटना मन हेलावून टाकणारी**

मुंबईतील भुलेश्वर परिसरात ‘भुलेश्वरचा राजा’ गणेशमूर्तीच्या आगमन मिरवणुकीदरम्यान घडलेली दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारी आहे. या दुर्घटनेत दोन गणेशभक्तांचा मृत्यू झाला असून काही गणेशभक्त जखमी झाले आहेत. जखमींवर आवश्यक उपचार सुरू आहेत. जखमींची प्रकृती लवकर सुधारावी, यासाठी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. प्राण गमावलेल्या गणेशभक्तांना भावपूर्ण श्रद्धांजली,

– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

**चौकशीतून सर्व तपशील समोर यायला हवा**

गणपती बाप्पांचे आगमन आपण मोठ्या उत्साहात आणि आनंदात करतो. मात्र, या दुर्दैवी घटनेत दोन गणेशभक्तांना जीव गमवावा लागला. ही घटना अत्यंत दुःखद आणि वेदनादायी आहे. पोलिसांकडून प्रकरणाची चौकशी सुरू असून चौकशी अहवालातून दुर्घटनेचे सर्व तपशील समोर यायला हवेत. जखमी भाविक लवकरात लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना करतो, असे आशिष शेलार यांनी सांगितले.

# कौठे मलकापूर सौरऊर्जा प्रकल्पाला स्थगिती

### मुख्यमंत्र्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश; औद्योगिक वसाहतीचा मार्ग मोकळा

**संगमनेर :** तालुक्याच्या पठारभागातील कौठे मलकापूर येथे प्रस्तावित औद्योगिक वसाहतीसाठी सरकारी गट क्रमांक १६२ मधील १०.८३ हेक्टर शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याच्या आमदार अमोल खताळ यांच्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. सदर जमिनीवर मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत प्रस्तावित सौरऊर्जा प्रकल्पाला स्थगिती देण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना दिले आहेत. त्यामुळे कौठे मलकापूर औद्योगिक वसाहतीसाठीचा मार्ग सुकर झाला आहे.



कौठे मलकापूर परिसरात एकूण २२७.५३ हेक्टर क्षेत्रावर औद्योगिक वसाहत प्रस्तावित आहे. यामध्ये सरकारी गट क्रमांक १६२ मधील १०.८३ हेक्टर शासकीय जमिनीचा समावेश आहे. मात्र, ही जमीन मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत सौरऊर्जा प्रकल्पासाठी देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली होती. औद्योगिक वसाहतीसाठी क्षेत्र प्रस्तावित असताना ही जमीन सौरऊर्जा प्रकल्पासाठी देण्याच्या निर्णयास स्थानिक ग्रामस्थांनी विरोध दर्शविला होता. कौठे मलकापूर ग्रामसभेनेही सौरऊर्जा प्रकल्पास नामंजुरी दर्शविली होती. तसेच सदर शासकीय जमीन औद्योगिक क्षेत्रासाठी प्रस्तावित असल्याने ती सौरऊर्जा प्रकल्पासाठी देणे योग्य ठरणार नसल्याचे तहसीलदारांनीही स्पष्ट केले होते. स्थानिक ग्रामस्थांना पूर्वकल्पना न देता सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्याची कार्यवाही होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर ग्रामस्थांनी त्यास तीव्र विरोध करत आंदोलनही केले होत.

दरम्यान, आमदार अमोल खताळ यांनी संगमनेर तालुक्याच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी पत्र दिले होते. कौठे मलकापूर येथील सरकारी गट क्रमांक १६२ मधील १०.८३ हेक्टर शासकीय जमीन सौरऊर्जा प्रकल्पासाठी न देता औद्योगिक वसाहतीसाठी हस्तांतरित करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली होती.

आमदार खताळ यांच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सदर सौरऊर्जा प्रकल्पाला स्थगिती देण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना दिले आहेत. त्यामुळे सौरऊर्जा प्रकल्पासाठी जमीन देण्याच्या कार्यवाहीला स्थगिती मिळाली असून, पुढील कार्यवाही औद्योगिक वसाहतीच्या दृष्टीने करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

कौठे मलकापूर येथे औद्योगिक वसाहत विकसित झाल्यास परिसरात नवीन उद्योग व गुंतवणुकीला चालना मिळण्याबरोबरच मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, तसेच पठार भागातील स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे. त्यामुळे या निर्णयाकडे संगमनेर तालुक्याच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

# दहा वर्षे पूर्ण केलेल्या संचालकांना निवडणुकीतून ‘डच्चू’ नाही!

### अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत ज्येष्ठ संचालकांना दिलासा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची रणधुमाळी रंगात आलेली असतानाच दहा वर्षांचा संचालकपदाचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या संचालकांना निवडणूक लढविण्यास अपात्र ठरवू नका, असे स्पष्ट आदेश राज्य सरकारने सहकार निवडणूक प्राधिकरणाला दिल्याने जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ संचालकांचा जीव भांड्यात पडला आहे. सहकार कायद्यात अशी अपात्रता नसताना बँकिंग नियमन कायद्यातील तरतुदींची परस्पर अंमलबजावणी करणे नियमबाह्य असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. केंद्र सरकारने गेल्या वर्षी बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करून जिल्हा मध्यवर्ती आणि नागरी सहकारी बँकांमध्ये दहा वर्षे किंवा त्याहून अधिक काळ संचालक राहिलेल्या व्यक्तींना पुढील निवडणूक लढविण्यास बंदी घातली होती. त्यासाठी तीन वर्षांचा ‘कूलिंग पीरियड’ही निश्चित करण्यात आला आहे.

**राज्य सरकारचा सहकार निवडणूक प्राधिकरणाला स्पष्ट आदेश**

या तरतुदीचा आधार घेत राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाने १६ जानेवारी २०२६ रोजी परिपत्रक काढून सहकारी बँकांच्या निवडणुकांमध्ये दहा वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केलेल्या संचालकांचे उमेदवारी अर्ज अमान्य करण्याचे निर्देश दिले होते. त्यामुळे काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या निवडणुकांमध्ये अनुभवी संचालकांना निवडणूक रिंगणाबाहेर जावे लागले.




मात्र, महाराष्ट्र सहकार कायद्यात किंवा २०१४च्या निवडणूक नियमांमध्ये अशी अपात्रता नमूद नसताना ती लागू करणे अन्यायकारक असल्याची तक्रार काही संचालकांनी राज्य सरकारकडे केली. त्यानंतर सहकार विभागाने राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर तसेच विधि व न्याय विभागाकडून **(पान ४ वर)**

# पाथर्डी तालुक्यात एकाच दिवशी सहा ठिकाणी छापे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पाथर्डी तालुक्यात सुरू असलेल्या अवैध धंद्याविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने धडक कारवाई केली. रविवारी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने एकाच दिवशी सहा ठिकाणी छापे टाकून मोठा देशी विदेशी दारूचा साठा जप्त केला. या कारवाईमुळे अवैध व्यवसायिकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

**देशी-विदेशी दारू साठा जप्त**

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेच्या शाखेने पाथर्डी तालुक्यात रविवारी एकाच दिवशी सहा ठिकाणी छापे टाकले. यावेळी अवैध दारू विक्रेत्यांवर टाकलेल्या छाप्यात पोलिसांनी सुमारे २३ हजार ६५० रुपयांचा दिवशी विदेशी दारूचा साठा जप्त केला.

याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात सहा स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या छाप्या कामी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे ,पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे ,अभिजीत अर्कल , अशोक लिपने , रणजीत जाधव ,रोहित येमुल या पथकाने परिश्रम घेतले.

# संत शेख महंमद महाराज मंदिर जीर्णोद्धारात अडथळा

## वक्फ नोंदणीवरून ट्रस्ट अध्यक्षांवर न्यायालयाच्या अवमानाचा आरोप

### न्यायालयाच्या आदेशानंतरही नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही न झाल्याचा दावा; २५ ऑगस्टला निर्णायक बैठक, आंदोलनाची दिशा ठरणार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा येथील सद्गुरू श्री संत शेख महंमद महाराज मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कामावरून सुरू असलेला वाद पुन्हा ऐरणीवर आला आहे. मंदिर जीर्णोद्धाराच्या कामात अडथळे आणून भाविक, प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या विश्वासाला तडा दिल्याचा गंभीर आरोप शेख महंमद बाबा दर्गा ट्रस्टचे अध्यक्ष अमीन शेख यांच्यावर करण्यात आला आहे. वक्फ बोर्डाकडील नोंदणी रद्द करण्याबाबत न्यायालयाने निर्देश देऊनही त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचा दावा करण्यात आला असून, याप्रकरणी न्यायालयाच्या अवमानाचा आरोपही करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर पुढील कायदेशीर पावले आणि आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी मंगळवार, २५ ऑगस्ट २०२६ रोजी विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे या बैठकीत नेमकी कोणती भूमिका घेतली जाते, याकडे श्रीगोंदा तालुक्याचे लक्ष लागले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मार्च २०२५ मध्ये संत शेख महंमद महाराज यांचा यात्रा उत्सव पारंपरिक व धार्मिक वातावरणात पार पडला. त्यानंतर शेख महंमद बाबा दर्गा ट्रस्टचे अध्यक्ष अमीन शेख यांनी तहसीलदारांकडे अर्ज करून यात्रा समितीच्या पदाधिकाऱ्यांवर दादागिरी, धार्मिक भावना भडकविणे, वर्गणी गोळा करणे, चिथावणीखोर भाषा वापरणे आदी स्वरूपाचे आरोप केल्याचे निवेदनात नमूद आहे.

मात्र, यात्रा उत्सव समिती व गावकऱ्यांनी हे आरोप निराधार असल्याची भूमिका घेत चौकशीची मागणी केली. त्यानंतर प्रकरण चांगलेच तापले. १७ ते २८ एप्रिल २०२५ दरम्यान तहसील कचेरीवर मोर्चा, धरणे आणि आत्मक्लेश आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात संत शेख महंमद महाराज व तुकाराम





महाराज यांच्या वंशजांसह सर्वपक्षीय नेते सहभागी झाल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले होते. यानंतर वक्फ बोर्डाकडील नोंदणी रद्द करण्याचा मुद्दा न्यायालयीन प्रक्रियेत गेला. धर्मादाय उपायुक्त, अहिल्यानगर यांच्या न्यायालयात झालेल्या युक्तिवादानंतर १५ मे २०२६ रोजी ट्रस्टच्या अध्यक्ष व विश्वस्त मंडळाने आवश्यक ठराव करून वक्फ बोर्डाकडील नोंदणी रद्द करण्यासाठी कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या आदेशानुसार दोन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. ही मुदत १५ जुलै २०२६ रोजी संपली, मात्र अद्याप नोंदणी रद्द करण्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांकडेही नोंदणी रद्द करण्याबाबत निवेदन देण्यात आले होते. त्यावर संबंधित कायदेशीर प्रक्रिया वक्फ न्यायाधिकरणाच्या माध्यमातून करण्याची भूमिका प्रशासनाकडून मांडण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे.

**‘अर्ज आंदोलनात फूट पाडण्यासाठीच?’**

न्यायालयाच्या आदेशानंतरही कार्यवाही न झाल्याने ट्रस्टच्या अध्यक्षांनी केलेले अर्ज आणि मागण्या केवळ आंदोलनात फूट पाडण्यासाठीच होत्या, असा आरोप प्रसिद्धीपत्रकातून करण्यात आला आहे. मात्र, या आरोपांबाबत ट्रस्ट अध्यक्षांची स्वतंत्र भूमिका समोर आलेली नसल्याने त्यांची बाजूही महत्त्वाची ठरणार आहे. मंदिर जीर्णोद्धाराच्या कामात कोणताही अडथळा येऊ नये आणि न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी भाविक व आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

**२५ ऑगस्टला ‘निर्णायक’ बैठक**

दरम्यान, विश्वस्त मंडळाकडून न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी झाली नसल्याचा आरोप करत पुढील कायदेशीर पावले आणि आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी २५ ऑगस्ट रोजी विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीची माहिती घनश्याम शेलार यांनी दिली. यावेळी गोपाळ मोटे, नवनाथ दरेकर, आघाव भाऊसाहेब, अजीम जकाते आदी उपस्थित होते.

# राहुल गांधींचा बदलता अवतार... भाजपच्या चिंतेची नवी सुरुवात?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

भारतीय राजकारणात प्रतिमा तयार होण्यासाठी वर्षे लागतात; मात्र ती बदलण्यासाठी त्याहून अधिक संयम, संघर्ष आणि सातत्य आवश्यक असते. २०१४ नंतर राहुल गांधी यांच्याबाबत निर्माण केलेली 'पप्पू' ही अवमानास्पद प्रतिमा आता मोठ्या प्रमाणात मागे पडताना दिसत आहे. त्याचवेळी २०२४च्या लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेसचे विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांनी स्वीकारलेली आक्रमक भूमिका राष्ट्रीय राजकारणाचा सूर बदलताना दिसतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्यावर थेट राजकीय हल्ले करताना राहुल गांधी आता केवळ सरकारच्या निर्णयांवर प्रतिक्रिया देणारे नेते राहिलेले नाहीत; तर स्वतःचा राजकीय अजेंडा ठरविणारा विरोधी पक्षनेता म्हणून पुढे येत आहेत. त्यामुळे भाजपच्या राजकीय रणनीतीसमोर नवे आव्हान उभे राहिले आहे.

२०१४ ते २०१९ या काळात काँग्रेसच्या सलग पराभवांमुळे राहुल गांधी यांच्या नेतृत्वक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले होते. भाजपची प्रचारयंत्रणा, समाजमाध्यमांवरील टीका आणि राजकीय विरोधकांनी त्यांच्या प्रतिमेभोवती निर्माण केलेले कथानक इतके प्रभावी होते की, राहुल गांधी यांची राजकीय क्षमता चर्चेऐवजी त्यांची खिल्ली उडविणे हा राष्ट्रीय राजकारणातील एक प्रमुख प्रवाह बनला होता. मात्र, राजकारणात कोणतीही प्रतिमा कायमची नसते. राहुल गांधी यांनी याच प्रतिमेला छेद देण्याचा मार्ग संघर्षातून निवडला.

कन्याकुमारीपासून कश्मीरपर्यंतची 'भारत जोडो यात्रा' हा त्यातील महत्त्वाचा टप्पा ठरला. त्यानंतर संसदेत आणि रस्त्यावर सामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवण्यास सुरुवात केली. शेतकरी, कामगार, महिला, बेरोजगार तरुण, छोटे व्यावसायिक यांच्याशी थेट संवाद साधण्याची त्यांची पद्धत पारंपरिक राजकीय व्यासपीठापेक्षा वेगळी ठरली. महागाई, बेरोजगारी, आर्थिक विषमता, कॉर्पोरेट मक्तेदारी, सामाजिक न्याय आणि संविधान यांसारखे मुद्दे त्यांनी राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले.

२०२४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले नाही आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील विरोधकांची ताकद वाढली. त्यानंतर राहुल गांधी यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद स्वीकारले. या भूमिकेने त्यांना सरकारला थेट प्रश्न विचारण्याचे घटनात्मक व्यासपीठ मिळाले. त्याचा त्यांनी प्रभावीपणे वापर केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांना थेट लक्ष्य करण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले. त्यामुळे संसदेतील त्यांच्या भाषणांकडे केवळ काँग्रेसच्या नेत्याचे वक्तव्य म्हणून नव्हे, तर सरकारसमोरील राजकीय आव्हान म्हणून पाहिले जाऊ लागले.

यातील आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे काँग्रेसचा राजकीय अजेंडा. पूर्वी भाजपच्या मुद्द्यांवर प्रतिक्रिया देण्यात काँग्रेसचा बराच राजकीय वेळ जात असल्याची टीका होत असे. आता राहुल गांधी स्वतःचे मुद्दे पुढे करताना दिसतात. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदारयादीतील कथित अनियमितता, 'मतचोरी', निवडणूक आयोगाची भूमिका, जातनिहाय जनगणना, अग्निवीर योजना, एमएसपी आणि पेपरफुटी यांसारख्या प्रश्नांना त्यांनी सातत्याने राजकीय चर्चेत आणले.

हातात संविधानाची प्रत घेऊन राहुल गांधी जाहीर सभा घेतात, संसदेत भूमिका मांडतात. ही प्रतिमा आता केवळ प्रतीकात्मक राहिलेली नाही. संविधान आणि सामाजिक न्यायाचा मुद्दा दलित, आदिवासी आणि मागासवर्गीय समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न त्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू बनला आहे. भाजपला रोखण्यासाठी विरोधकांना एकत्र आणण्याच्या प्रयत्नातही राहुल गांधींची भूमिका बदललेली दिसते. काँग्रेसचा 'मोठा भाऊ' हा पारंपरिक पवित्रा बाजूला ठेवून प्रादेशिक पक्षांशी संवाद, समन्वय आणि लवचिकता दाखविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळे संसदेत विरोधकांची एकजूट अधिक स्पष्टपणे दिसू लागली.

याचा अर्थ भाजपची राजकीय पकड संपली, असा निष्कर्ष मात्र काढणे धोकादायक ठरेल. भाजपकडे आजही मजबूत संघटनात्मक रचना, तळागाळातील बूथ नेटवर्क, प्रभावी प्रचारयंत्रणा आणि निवडणूक व्यवस्थापनाचा मोठा अनुभव आहे. केंद्रातील सत्तेचा राजकीय आणि प्रशासकीय प्रभावही कमी लेखता येणार नाही. त्यामुळे राहुल गांधींच्या आक्रमकतेमुळे भाजपला आव्हान निर्माण झाले असले तरी हे आव्हान निवडणुकीतील विजयात रूपांतरित करण्यासाठी काँग्रेसला अजून मोठा पल्ला गाठायचा आहे.

राहुल गांधींसमोरील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे राष्ट्रीय स्तरावरील लोकप्रियता आणि संसदीय प्रभावाचे रूपांतर राज्यांच्या विधानसभा निवडणुकांतील ठोस विजयात करणे. अनेक राज्यांत काँग्रेसची संघटनात्मक रचना कमकुवत आहे. पक्षातील गटबाजी, स्थानिक नेतृत्वाचा अभाव आणि निवडणुकीच्या वेळी सक्रिय होणारी संघटना या समस्या अजूनही कायम आहेत. केवळ राहुल गांधींच्या प्रतिमेवर निवडणुका जिंकता येणार नाहीत. त्यासाठी मजबूत स्थानिक नेतृत्व, बूथस्तरावरील संघटन आणि स्पष्ट निवडणूक रणनीती आवश्यक आहे.

त्याहूनही महत्त्वाचा प्रश्न आहे तो पर्यायी राजकीय दृष्टिकोनाचा. भाजपच्या चुका दाखवणे ही विरोधी पक्षाची जबाबदारी आहे; पण त्यापलीकडे देशाला पुढे नेण्यासाठी काँग्रेसकडे काय आराखडा आहे, हे राहुल गांधींना स्पष्ट करावे लागेल. अर्थव्यवस्था, रोजगार, संरक्षण, परराष्ट्र धोरण, शेती, उद्योग, तंत्रज्ञान आणि सामाजिक न्याय या प्रत्येक क्षेत्रासाठी व्यवहार्य धोरण मांडण्याची वेळ आता आली आहे.

राहुल गांधींच्या राजकीय प्रवासात बदल झाला आहे, हे नाकारता येणार नाही. कालपर्यंत ज्यांची खिल्ली उडवली जात होती, तेच राहुल गांधी आज सत्ताधाऱ्यांना अस्वस्थ करणारे प्रश्न विचारत आहेत. मात्र, राजकारणात प्रतिमा बदलणे ही पहिली पायरी असते; सत्ता मिळविणे हा त्यानंतरचा कठीण टप्पा असतो.

भाजपच्या चुका राहुल गांधींचे राजकीय स्थान मजबूत करू शकतात; पण केवळ भाजपच्या चुका काँग्रेसला सत्ता देणार नाहीत. राहुल गांधींना जनतेचा विश्वास दीर्घकाळ टिकवायचा असेल, तर आक्रमक विरोधी पक्षनेत्यापासून सक्षम पर्यायी नेतृत्वापर्यंतचा प्रवास पूर्ण करावा लागेल. त्यासाठी संघर्षासोबत संघटन, टीकेसोबत पर्याय आणि घोषणांसोबत स्पष्ट कृतीआराखडा आवश्यक आहे.

भारतीय लोकशाहीसाठी मात्र हा बदल महत्त्वाचा आहे. सत्तेला प्रभावी विरोधक असणे ही लोकशाहीची गरज आहे. राहुल गांधी हा विरोधक म्हणून किती दूर जातात आणि त्यांचे राजकीय पुनरागमन किती टिकाऊ ठरते, याचे उत्तर आगामी निवडणुका देतील. पण एक गोष्ट स्पष्ट आहे की, २०१४चा राहुल गांधी आणि २०२६चा राहुल गांधी यांच्यातील राजकीय अंतर मोठे आहे. आणि हे अंतर भाजपनेही आता गांभीर्याने मोजायला सुरुवात केली आहे.

## संघटनेच्या हितासाठी आचारसंहिता पाळून कार्यरत रहाण्याचा प्रयत्न करा : कुमार पाटील



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : संघटनेचे प्रतिनिधित्व करताना प्रत्येक पदाधिकाऱ्याने आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. संघटनेच्या हितासाठी सातत्याने कार्यरत राहून संघटनेला बळ दिल्यास सर्व सदस्यांना सहकार्य करून त् यांच्या प्रश्नांना न्याय देता येईल असे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा क्लिनिकल लॅब असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष कुमार पाटील यांनी केले.

नेवासा तालुका क्लिनिकल लॅब असोसिएशनच्या वतीने केंद्र शासनाचा एनसीएएचपी व सी ई ए ॲक्ट तसेच महाराष्ट्र शासनाचे आस्थापना विधेयक ५१/२६ या विषयावर संवाद व चर्चा बैठकीचे आयोजन भेंडा येथील हॉटेल स्वागत येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून मार्गदर्शन करताना कुमार पाटील बोलत होते.

यावेळी कुमार पाटील यांनी क्लिनिकल लॅब क्षेत्राशी संबंधित कायदेशीर बाबी, संघटनेचे ध्येय-धोरण, पदाधिकाऱ्यांची जबाबदारी तसेच सदस्यांच्या प्रश्नांसाठी संघटनेच्या माध्यमातून एकजुटीने काम करण्याचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

आर्ले पाटील अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि. कुकाणा या पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. गणेश आर्ले पाटील यांचे वैद्यकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. तसेच वैद्यकीय क्षेत्राला विशेष प्राधान्य देण्यासाठी त्यांनी आर्ले पाटील अर्बन पतसंस्थेच्या वतीने यापूर्वी ३०० पेक्षा जास्त आशा सेविका व अंगणवाडी सेविका यांना विनातारणी कर्ज देऊन त्यांच्या आर्थिक अडचणी दूर केल्या तसेच आता नेवासा लॅब असोसिएशनच्या सदस्यांना देखील कर्ज तसेच बचतीच्या विविध सुविधा उपलब्ध करण्याचे त्यांनी नमूद केले

कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष पांडुरंग काकडे,सचिव राजेश गुंजाळ,खजिनदार अनिल पहारे,तालुकाध्यक्ष संजय कर्जुले, डॉ. गणेश आर्ले पाटील, गणेश आवारे, माजी सरपंच गणेश गव्हाणे, नामदेव शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. व्यासपीठावरील मान्यवरांनी उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन करत संघटनेच्या आगामी वाटचालीबाबत मनोगत व्यक्त केले.

नेवासा तालुका कार्यकारिणीची निवड जाहीर यावेळी जिल्हाध्यक्ष कुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा तालुका क्लिनिकल लॅब असोसिएशनच्या कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली. तसेच उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.कार्यक्रमास नेवासा तालुक्यातील क्लिनिकल लॅब असोसिएशनचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये बालगुडे सर, मुस्तफा कादरी, विजय म्हस्के, कैलास काळे,शुभम नवले, जालिंदर गोरे,प्रवीण शिंदे,रवी काळे,गणेश दरंदले,सौ. दीपा काळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.या कार्यक्रमास आर्ले पाटील को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे सौजन्य लाभले. कार्यक्रमानंतर आर्ले पाटील हेल्थ केअर व आर्ले पाटील क्रेडिट सोसायटीच्या वतीने उपस्थित पदाधिकारी व सदस्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यामुळे कार्यक्रमाला आपुलकीच्या वातावरणाची जोड मिळाली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ कचरे यांनी केले, तर कैलास काळे यांनी आभार मानले.

## गोयकर वस्ती येथे अखंड हरिनाम सप्ताहास धर्मध्वजारोहणाने प्रारंभ



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील ज्योतिर्लिंग देवस्थान, गोयकर वस्ती (गायरमाथा) येथे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन महोत्सव व अखंड हरिनाम सप्ताहास रविवारपासून उत्साहात प्रारंभ झाला. रविवार (दि. २३) ते गुरुवार (दि. २७ ऑगस्ट) दरम्यान हा धार्मिक सोहळा होणार आहे. श्री समर्थ सद्गुरू किसनगिरीबाबा, श्री क्षेत्र देवगड व वै. ह.भ.प. बन्सी महाराज तांबे, श्री क्षेत्र नेवासा यांच्या आशीर्वादाने, गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज व महंत स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने तसेच ह.भ.प. सुखदेव महाराज मुंगसे व ह.भ.प. सदाशिव महाराज पुंड यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.रविवारी सकाळी ९ वाजता ह.भ.प. महंत सुरेशानंदजी महाराज शास्त्री व ह.भ.प. सुखदेव महाराज मुंगसे यांच्या शुभहस्ते धर्मध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सरपंच चंद्रकांत मुंगसे, माजी सरपंच बाजीराव पाटील मुंगसे, सदाशिव महाराज पुंड, प्रदीप महाराज वाघमोडे यांच्यासह ग्रामस्थ व भाविक उपस्थित होते. दि. २३ ते २६ ऑगस्टदरम्यान दररोज विविध कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. बुधवारी (दि. २६) सायंकाळी दिंडी मिरवणूक काढण्यात येणार आहे. गुरुवारी सकाळी ९ ते ११ वाजता ह.भ.प. स्वामी नित्यानंदगिरीजी महाराज यांचे काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्यास ज्योतिर्लिंग तरुण मंडळ, बालाजी देडगाव भजनी मंडळ व पाचुंदा भजनी मंडळाचे सहकार्य लाभत आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## लेखी पत्रानंतर खिर्डी येथील पीडित कुटुंबाचे उपोषण मागे



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ७४, ३३३, ११८(१), ११५(२), ३५२, ३५२(२)(३), १८९(२), १९१(२)(३), १९० तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ मधील कलम ३(१)(ु)(ळ), ३(१)(ॲ)(ी) आणि ३(२)(ीं-र) आरोपींना अटक करण्यात यावी या मागणीसाठी खिर्डी येथील पीडित कुटुंबाने सुरू केलेले उपोषण अखेर उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले आहे. पीडित कुटुंबाने १५ ऑगस्ट रोजी श्रीरामपूर येथील प्रशासकीय इमारती समोर संत तेरेजा चौक येथे कुटुंबासह वरून उपोषणास बसले होते. अखेर शनिवार दिनांक २२ ऑगस्ट रोजी लेखी आश्वासनास नंतर हे उपोषण मागे घेण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या लेखी पत्रात म्हटले आहे की,

संबंधित गुन्ह्यात राहुल विठ्ठल धायगुडे (वय ३६) याला १७ जुलै २०२६ रोजी रात्री ११.११ वाजता अटक करण्यात आली आहे. तसेच पंकज विठ्ठल धायगुडे , विशाल भगवान म्हसाळ, जालू ऊर्फ जालिंदर सोमनाथ देवकाते, बाबासाहेब ऊर्फ बाबू भाऊसाहेब हाळनोर आणि जनार्दन ऊर्फ जना बाबादी विटनोर( सर्व राहणार खिर्डी, तालुका श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर ) यांचा शोध घेऊन मिळून येतात त्यांना सदर गुन्ह्यात अटक करीत आहोत तरी आपण आपले उपोषण मागे घेऊन पोलीस तपासत सहकार्य करावे असे आश्वासन पीडित कुटुंबाला देण्यात आले आहे. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे, लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे, वंचित बहुजन आघाडी नेवासा तालुकाध्यक्ष पोपटराव सरोदे ,श्रीरामपूर लहुजी शक्ती सेनेचे प्रवीण वैरागर ,विजय शेलार,आकाश अडंगळे,अर्जुन दोडके, विशाल शिरसाठ,अमोल मिसाळ, ज्ञानेश्वर जगधने,कांतिलाल जगधने, रवि शेलार,सीताराम शिरसाठ आदी उपस्थित होते.

## पिकांच्या सुरक्षेसाठी शेतकरी सरसावले

### ३८ हजारांहून अधिक शेतकऱ्यांचा सहभाग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : शेती म्हटली की निसर्गाची अनिश्चितता आलीच. कधी अतिवृष्टी, कधी पावसाचा खंड, तर कधी गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे हातातोंडाशी आलेले पीक क्षणार्धात उद्ध्वस्त होते. या पार्श्वभूमीवर पिकांना आर्थिक सुरक्षा मिळावी, यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेला राहुरी आणि राहाता तालुक्यात शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. दोन्ही तालुक्यांतील ३८ हजार ६२३ शेतकऱ्यांनी आपल्या पिकांना विमा संरक्षण देत शेतीतील जोखीम कमी करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

राहाता तालुक्यात २५ हजार १०४ शेतकऱ्यांनी ५५ हजार ८७०.२८ हेक्टर क्षेत्रासाठी पीक विमा काढला आहे. या क्षेत्रासाठी तब्बल १५६.७५ कोटी रुपयांचे विमा संरक्षण मिळाले आहे. त्यामुळे राहाता तालुक्यातील मोठ्या शेती क्षेत्राला नैसर्गिक संकटाच्या काळात आर्थिक आधार मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.राहुरी तालुक्यातही पीक विमा योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. १३ हजार ५१९ शेतकऱ्यांनी ११ हजार ५८९ हेक्टर क्षेत्रासाठी पीक विमा काढला आहे. त्यामुळे राहुरी तालुक्यातील हजारो हेक्टर क्षेत्र विमा संरक्षणाच्या कक्षेत आले आहे. शेतीच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असताना नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान शेतकऱ्यांसाठी मोठे आर्थिक संकट ठरते. अशा वेळी पीक विमा योजना आधार देणारी ठरू शकते.



## पर्यावरणपुरक शेतीसाठी संजीवनीचे पहिले पाउल : आ. विवेक कोल्हे.

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : डिझेलच्या दरात सातत्यांने वाढ होत असल्यांने शेती मशागतीच्या तत्सम खर्चात दिवसेंदिवस शेतक-यांसमोर नवनविन प्रश्न निर्माण होत आहे त्यासाठी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने पर्यावरण पूरक आधुनिक तंत्राच्या वापराला सर्वोच्च प्राधान्य देत इलेक्ट्रीक ट्रॅक्टरडरे पर्यावरणपुरक शेतीसाठी पहिले पाउल टाकले असल्याचे प्रतिपादन आमदार विवेक कोल्हे यांनी केले. माँत्रा कंपनीने शेती व अन्य कामासाठी ४५ एच. पी. क्षमतेच्या इलेक्ट्रीक ट्रॅक्टरची नव्यांने निर्माती केली असुन राज्यात सर्वप्रथम सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याने सदर ट्रॅक्टरची खरेदी केली त्याची पहिली प्रात्याक्षीक राईड श्रीसाईबाबांच्या शिर्डी येथे गुरूवारी घेण्यांत आली त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी मात्रा इलेक्ट्रीकचे महाराष्ट्र विभागीय प्रमुख प्रकाशगिरी प्रास्तविक करतांना म्हणांले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आधुनिक डिजीटल तंत्रज्ञानातुन आत्मनिर्भर विकसीत भारतात पर्यावरणपुरक उपक्रमांना सातत्यांने



प्राधान्य दिले असुन त्यातुनच या ट्रॅक्टरची निर्मीती करण्यांत आली आहे. विक्री विभागाचे बलराम मुर्ती म्हणाले की, शेतीतील दैनंदिन कामासाठी मात्रा इलेक्ट्रीक ४५ एचपी क्षमतेचा ट्रॅक्टर दोन तासांच्या सिंगल चार्जमध्ये १०० किलोमिटर प्रवासाची क्षमता असुन त्याच्या वापरातुन डिझेलच्या खर्चात मोठया प्रमाणांत बचत होते. आमदार विवेक कोल्हे यांनी या ट्रॅक्टरची तांत्रीक वैशिष्टये व कार्यपध्दती जाणुन घेतली. आमदार विवेकभैय्या कोल्हे पुढे म्हणाले की, अमेरिका इस्रायल विरूध्द इराणच्या युध्दात आपल्याला पेट्रोल, डिझेल, गॅस संदर्भात मोठया प्रमाणांत अडचणींचा सामना करावा लागला. शेतकऱ्यांना शेतीची कामे करताना अन्य पर्यायी मार्गाचा अवलंब करताना असंख्य त्रासाला सामोरे जावे लागले. या इलेक्ट्रीक ट्रॅक्टरच्या सहायांने शेतीतील मशागतीची कामे केली तर पर्यावरणाची हानी कमी होते, वेळेबरोबरच इंधन खर्चात मोठी बचत होते. माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी विकसीत विरूध्द विकसनशील देशात शेती खर्चात बचत होण्यांसाठी सातत्यांने विविध उपाययोजना केल्या. संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे यांनीही पर्यावरणपुरक शेतीची इलेक्ट्रीक साधने वापराला सर्वोच्च प्रधान्य दिले आहे. त्यामुळे शेतक-यांनी इलेक्ट्रीक ट्रॅक्टरच्या सहायांने शेतीचे तंत्र अवलंबवावे व शेती खर्चात बचत करावी. भविष्यात शेतीमध्ये इलेक्ट्रीक वाहनांचा वापर वाढेल, तेव्हा शेतकऱ्यांनी नव्या बदलाला सामोरे जावे असेही ते शेवटी म्हणांले. सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे कारखान्याचे सर्व संचालक मंडळ, खाते प्रमुख, उपखातेप्रमुख, शेतकी विभागाचे कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

## 'ज्ञानोदय इंग्लिश स्कूलचे प्राचार्य रावसाहेब चौधरी मुख्याध्यापक संघाच्या सचिवपदी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या नेवासा येथील ज्ञानोदय इंग्लिश स्कूलचे प्राचार्य रावसाहेब चौधरी यांची नेवासा तालुका मुख्याध्यापक संघाच्या सचिवपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. सोमवार दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी नेवासा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी रामनाथजी कराड यांच्या अध्यक्षतेखाली त्रिमूर्ती विद्यालय नेवासा फाटा येथे विविध शैक्षणिक प्रश्नांसंदर्भात मुख्याध्यापकांची सहविचार सभा संपन्न झाली. या सहविचार सभेसाठी नेवासा तालुक्यातील विविध विद्यालयांचे मुख्याध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते. विद्यार्थी, शिक्षक , मुख्याध्यापक व विद्यालयांच्या विविध प्रश्नांबाबत तसेच विविध शासकीय योजनांबाबत चर्चा झाल्यानंतर नेवासा तालुका मुख्याध्यापक संघाच्या कार्यकारणीबाबत उपस्थितांमध्ये साधक बाधक चर्चा झाली. सचिवपदी असलेल्या मुख्याध्यापक रामलाल कर्डिले यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या जागेवर प्राचार्य रावसाहेब चौधरी यांची शिक्षक संघटनेतील योगदानाची दखल घेऊन निवड करण्यात आली. नेवासा तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सोपानराव काळे यांनी कार्यकारिणी बदलाविषयी सूचना मांडली. त्यास उद्धवराव सोनवणे यांनी अनुमोदन दिले.नेवासा तालुक्यातील उपस्थित सर्व मुख्याध्यापकांनी टाळ्यांच्या गजरात या निवडीचे स्वागत केले. गटशिक्षणाधिकारी रामनाथ कराड यांच्या हस्ते नेवासा तालुका मुख्याध्यापक संघाचे नूतन सचिव म्हणून निवड झाल्याबद्दल प्राचार्य रावसाहेब चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर विस्ताराधिकारी भागिनाथ बडे, बाळासाहेब मोटे,प्राचार्य सोपानराव काळे, बाळासाहेब पंडित, उद्धवराव सोनवणे, राजेंद्र लोहकरे, राजेंद्र शेंडे,अशोक शेंडगे, सावता गायकवाड , रमेश खाटीक,शमी सर आदी मान्यवर त्याचप्रमाणे नेवासा तालुका मुख्याध्यापक संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या निवडीबद्दल प्राचार्य रावसाहेब चौधरी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## एकाच वेळी तीन प्रशासकीय पदे मिळवणाऱ्या प्राजक्ताचा नागरी सन्मान



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील कुकाणा येथील भूमिकन्या प्राजक्ता संजय कचरे यांनी राज्य लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून एकाच वेळी तीन महत्त्वपूर्ण पदांवर नियुक्ती झाल्याबद्दल देडगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. प्राजक्ता कचरे यांनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर सहाय्यक कक्ष अधिकारी (अडज), राज्य कर निरीक्षक (डढख) व उपनिबंधक (डठ) या तीन शासकीय पदावर निवड झाली. त्यांच्या या यशाबद्दल देडगाव ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करत त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. तसेच प्राजक्ता कचरे यांचा बालाजी देवस्थान ट्रस्ट व अहिल्याबाई होळकर विद्यालय यांच्या वतीनेही सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच बाजीराव पाटील मुंगसे होते. तर प्रास्ताविक भाऊसाहेब सावंत सर यांनी करत आपण पुन्हा यूपीएससीच्या माध्यमातून पोस्ट मिळवावी व जिल्हाधिकारी म्हणून आम्हाला सन्मान करण्याचा योग घडवून आणावा म्हणत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी सरपंच चंद्रकांत मुंगसे म्हणाले की, ग्रामीण भागातील मुलांमध्ये गुणवत्ता आहे व अभ्यास ध्येय व सातत्यपूर्ण प्रामाणिक कष्ट यामुळे आज हे पद संपादन केले आहे.

प्राजक्ता कचरे यांनी सत्काराबद्दल ग्रामस्थांचे आभार मानत, भविष्यातही मिळालेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याचा विश्वास व्यक्त केला. मला ओळखत नसूनही आपण सर्वजण सन्मानास आला त्याबद्दल सर्वांचे आभार मानत ग्रामीण भागातील पालकांनी मुलावर विश्वास ठेवावा व त्यांना संधी उपलब्ध करून दिल्यास नक्की सोन करतील असा आत्मविश्वास व्यक्त केला.त्यांच्या या यशामुळे कुकाणा गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यावेळी देवराव तात्या मुंगसे, आजिनाथ आठरे, माजी सरपंच दत्ता पाटील मुंगसे, माजी उपसरपंच महादेव पुंड, माजी उपसरपंच बाळासाहेब मुंगसे, निलेश कोकरे, अहिल्याबाई होळकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात करण्यात आलेल्या सन्मान प्रसंगी मुख्याध्यापक किशोर मुंगसे व सर्व शिक्षक उपस्थित होते. यावेळी प्राजक्ता कचरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राजक्ता कचरे यांचा बालाजी देवस्थानच्या कार्यालयामध्येही सन्मान करण्यात आला. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष भाऊसाहेब मुंगसे, विश्वस्त सुभाष मुंगसे तसेच देवस्थानचे खजिनदार संभाजीराजे काजळे उपस्थित होते. यावेळी पोपटराव बनसोडे, भाजप युवा मोर्चाचे उपाध्यक्ष आकाश चेडे, जेऊर गावचे सरपंच रामदास खराडे, महादेव मुंगसे, रमेशदेवा तांदळे, संदीप चेडे, संजय तांबे, चांगदेव टकले आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार युनूस पठाण यांनी केले तर आभार ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके यांनी मानले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# मानोरी केटीवेअरची साठवण क्षमता दुप्पट करणार : मंत्री राधाकृष्ण विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : मानोरी केटीवेअरची साठवण क्षमता लवकरच दुप्पट करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच मुळा धरणातून पावसाळ्यात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी वळवून धरणाची साठवण क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिली. राहुरी तालुक्यातील दौर्‍याप्रसंगी नागरिकांशी संवाद साधताना विखे पाटील बोलत होते. राहुरी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना चालना देण्यात येत असून, सिंचन, शेती, उद्योग आणि रोजगारनिर्मिती या क्षेत्रांना प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



मानोरी केटीवेअरची साठवण क्षमता वाढल्यास परिसरातील पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर करता येणार असून, सिंचनासाठी त्याचा मोठा फायदा शेतकर्‍यांना होणार आहे. तसेच मुळा धरणात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त पाणी उपलब्ध होते. हे पाणी वाहून न जाता त्याचा उपयोग धरणाची साठवण क्षमता वाढविण्यासाठी करता यावा, यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येत असल्याचे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकर्‍यांसाठी ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली असून, या निर्णयामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकर्‍यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शेतकर्‍यांना शासनाच्या कर्जमाफीची प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. याप्रसंगी आ. अक्षय कर्डिले यांनी राहुरी विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून गती मिळत असल्याचे सांगितले.

मुळा धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्यांमधून तसेच वांबोरी चारीला पाणी सोडण्यात आल्याबद्दल त्यांनी पालकमंत्र्यांचे आभार मानले.शेतकर्‍यांचा सिंचनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असून, शेतकर्‍यांना न्याय देण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही कर्डिले यांनी दिली. तालुक्यातील प्रलंबित रस्ते, सिंचन व इतर पायाभूत सुविधांची कामे टप्प्याटप्प्याने मार्गी लावावीत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. यावेळी राहुरी, मानोरी, वळण व केंदळ परिसरातील नागरिक उपस्थित होते.

तसेच पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील, प्रदीप हापसे, प्रांताधिकारी विनीत शिर्के, तहसीलदार अमित पवार, गटविकास अधिकारी मोहसीन शेख, सहायक निबंधक रावसाहेब खेडकर आदी उपस्थित होते.

## द•ख•ल

### चांदा येथील युवक कावड घेऊन मंगळुरकडे रवाना

**चांदा** : नेवासा तालुक्यातील चांदा येथील थोरात नगर मधिल युवक श्री क्षेत्र मंगळुर येथील मांगिरबाबाला प्रवरा संगम येथुन कावडीने पाणी घेऊन जाणार असून जल अभिषेक घालण्यासाठी निघाले. सालाबादप्रमाणे याही वर्षी चांदा येथील थोरात नगर परिसरातील युवक येथील लक्ष्मी आईचे दर्शन घेऊन वाजत गाजत चांदा येथील वेशीतील मांगिरबाबाचे पुजन करून मांगिर बाबा की जय या घोषणां देत हे युवक वरखेड येथे महालक्ष्मी चे दर्शन घेऊन पुढे प्रवरासंम येथून कावडीने पाणी घेऊन पायी चालत लखमापूर येथे मुक्काम, वाळुंज पंढरपूर येथे मुक्काम संभाजी नगर मार्गे, आळण गाव मुक्काम, फुलंब्री, सिल्लोड, मंगळुर येथे कावडी दाखल होतील वाजत गाजत कावडीने मांगिरबाबा देवाला जल अभिषेक घालण्यासाठी जात आहेत. त्यानंतर छबीना मिरवणूक काढण्यात येणार आहे तसेच मंगळूर ग्रामस्थांच्या वतीने या कावडीतील भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे या मोठ्या प्रमाणात भाविक उपस्थित राहतात अशी माहिती या वेळेस कावडीतील युवकांनी दिली.

### श्री शनैश्वर देवस्थानचे संस्थापक अध्यक्ष स्व. बाबुराव बानकर यांची २३ वी पुण्यतिथी साजरी



**सोनई** : श्री क्षेत्र शनिशिंगणापूर (ता. नेवासा) येथील जगप्रसिद्ध श्री शनैश्वर देवस्थानचे संस्थापक अध्यक्ष स्व. बाबुराव बानकर यांच्या २३व्या पुण्यतिथीनिमित्त देवस्थानच्या वतीने विविध धार्मिक विधी करून अभिवादन करण्यात आले. श्रावण दशमीच्या तिथीनुसार शनिवार, दि. २२ रोजी सकाळी ९ वाजता हा पुण्यस्मरण सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी शनी देवाच्या मूर्तीला विधिवत तैलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर देवस्थानचे मुख्य पुरोहित अशोकदेव कुलकर्णी यांनी मंत्रोच्चारात स्व. बाबुराव बानकर यांच्या मूर्तीला दुग्धाभिषेक केला. देवस्थानच्या वतीने स्व.बानकर भाऊ यांच्या मूर्तीला फेटा व उपरणे परिधान करून फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

# कै. ओमप्रकाश गुलाटी स्मृती दिनानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**श्रीरामपूर** : अहमदनगर जिल्हा केमिस्ट ण्ड ड्रॅगिस्ट असोसिएशन, कै. ओमप्रकाश गुलाटी फाउंडेशन आणि श्रीरामपूर तालुका केमिस्ट ण्ड ड्रॅगिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कै. ओमप्रकाशजी गुलाटी यांच्या स्मृती दिनानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व दैनंदिन वापराच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले. कॅनॉल रोड येथील जनता हायस्कूल विद्यार्थी वसतिगृहात शनिवारी (दि. २२ ऑगस्ट) हा उपक्रम उत्साहात पार पडला. केमिस्ट असोसिएशनच्या वतीने गेल्या ३५ वर्षांपासून हा सामाजिक उपक्रम सातत्याने राबविला जात असून, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात 'कै. ओमप्रकाश गुलाटी स्मृती सप्ताह' साजरा केला जातो. या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात दिला जात आहे.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष रवींद्र गुलाटी म्हणाले की, महाराष्ट्र राज्य केमिस्ट ण्ड ड्रॅगिस्ट असोसिएशनची सुरुवात नगर जिल्ह्यातून झाली असून, कै. ओमप्रकाशजी गुलाटी हे राज्य संघटनेचे संस्थापक होते. त्यांच्या प्रेरणेतून संघटना सामाजिक कार्यात सातत्याने योगदान देत आहे. शहरातील व्यापारी, डॉक्टर्स असोसिएशन, लायन्स व रोटरी क्लब यांनी पुढाकार घेऊन गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास कोविलभाऊ खेमनर, संजय दुधेडिया, प्रवीण गुलाटी, कैलास चायल, सचिन चुडीवाल, प्राचार्य सुनील साळवे यांच्यासह असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्य, शाळा व्यवस्थापन व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उक्कलगाव परिसरात विजेचा लपंडाव

## वीजपुरवठा सुरळीत करण्याची शेतकर्‍यांची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**उक्कलगाव** : जुलै आणि ऑगस्ट महिन्यात पावसाने दांडी मारल्यामुळे पिकांची अवस्था केविलवाणी झाली आहेत. अशा बिकट परिस्थितीत विजेचा लपंडाव आणि अतिरिक्त भारनियमनाचा मोठा फटका परिसरातील पिकांना बसत असून, शेतकर्‍यांची पुरती दमछाक होत आहेत. शेतीपंपाचा वीजपुरवठा तातडीने सुरळीत करण्याची आक्रमक मागणी उक्कलगाव येथील शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव, गळनिब आणि पटेलवाडी परिसराला बेलापूर व ममदापूर येथील वीज केंद्रातून वीजपुरवठा होतो. मात्र, विजेचा तुटवडा निर्माण झाल्याचे कारण देत महावितरणकडून अचानक अतिरिक्त भारनियमन केले जात आहे. सध्या खरिपातील कपाशी, मका, कांदा यांसारखी पिके जोमात असताना आणि दुसरीकडे ढगाळ वातावरणामुळे पिकांवर रोगांचे संकट ओढवलेले असताना, शेतीपंपांना मिळणाऱ्या आठ तासांच्या विजेतून प्रत्यक्षात केवळ सहा ताससुद्धा सुरळीत वीज मिळत नाही. परिसरात बिबट्याचा वावर असल्याने शेतकर्‍यांना रात्रीच्या वेळी पिकांना पाणी देण्यासाठी शेतात जाणे अशक्य झाले आहे. दिवसा वीज पुरवठा सुरळीत नसल्यामुळे पिकांची तहान भागवणे अत्यंत अवघड झाले आहे. कांदा पिकासह जनावरांची चारापिके, ऊस, मका तसेच मलचिंगचा वापर करून घेतलेली तरकारी पिके पाण्याअभावी सुकत चालली आहेत.

### 'अनुभवी कर्मचारी' नियुक्त करा!

उक्कलगाव सबस्टेशनमध्ये 'काही' महिन्यांपूर्वीच कंत्राटी कर्मचारी गणेश थोरात या कर्मचाऱ्याचा ऑपरेटर च्या हलगर्जीपणाच्या कारभारामुळे वीजेचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाला होता. मयत थोरात यांना उक्कलगाव परिसरातील वीज वितरणाचा आणि वीजवाहिन्यांचा चांगला अनुभव होता. त्यांच्या जागी आता परिसराची संपूर्ण माहिती असणाऱ्या अनुभवी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी आग्रही मागणी उक्कलगावकरांनी महावितरण प्रशासनाकडे केली.

# नमो शेतकरी सन्मान योजनेचे दोन हप्ते प्रलंबित ; शेतकरी प्रतीक्षेत

## आतापर्यंत ८ हप्त्यांचे वितरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ममदापुर** : राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक हातभार देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत आतापर्यंत ८ हप्ते वितरित झाले आहेत. मात्र, आणखी दोन हप्ते प्रलंबित असल्याने हे हप्ते कधी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार, याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे. शेतीसाठी लागणारे बियाणे, खते, औषधे, मजुरी तसेच इतर खर्च दिवसेंदिवस वाढत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत शासनाच्या विविध योजनांमधून मिळणारी आर्थिक मदत शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची ठरते. त्यामुळे नमो शेतकरी योजनेच्या प्रलंबित हप्त्यांची शेतकरी आतुरतेने वाट पाहत आहेत.

नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या पीएम किसान योजनेसोबत राज्य शासनाकडूनही आर्थिक मदत दिली जाते. आतापर्यंत ८ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यावर वितरित झाले असून दोन हप्ते अद्याप प्रलंबित आहेत. त्यामुळे हे प्रलंबित हप्ते नेमके कधी वितरित होणार, याबाबत शेतकऱ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. अनेक शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करीत असताना शासनाकडून मिळणाऱ्या मदतीची प्रतीक्षा करीत आहेत. दरम्यान, प्रलंबित दोन हप्त्यांच्या वितरणाची तारीख शासनाने स्पष्ट करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. हप्ते विलंबाने मिळत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नियोजन करताना अडचणी येत आहेत. नमो शेतकरी योजनेचे प्रलंबित दोन हप्ते कधी वितरित होणार, याबाबत शासनाकडून अधिकृत घोषणा होण्याची शेतकरी प्रतीक्षा करीत आहेत.

पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रलंबित हप्त्यांची रक्कम लवकरात लवकर जमा करावी आणि हप्ता वितरणाबाबत स्पष्ट तारीख जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे. आठ हप्ते मिळाले, दोन हप्ते बाकी... आता प्रलंबित हप्त्यांची रक्कम कधी खात्यावर जमा होणार? याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# दाढ बुद्रुकमध्ये नवनाथ संगीतमय कथा सोहळ्याने भक्ती-शक्तीचा जागर

## गावच्या एकोप्याचा आणि आध्यात्मिक वाटचालीचा आदर्श : अरुणगिरी महाराज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : अध्यात्माच्या माध्यमातून मनःशांती मिळते, मने जोडली जातात आणि समाजात एकोपा निर्माण होतो. संत-महंतांच्या मार्गदर्शनातून सुरू असलेले अध्यात्मिक कार्य समाजाला सकारात्मक दिशा देणारे आहे. दाढ बुद्रुक येथे सुरू असलेला संगीतमय नवनाथ कथा सोहळा हा भक्ती, शक्ती आणि अध्यात्माचा अनोखा संगम असून, ग्रामस्थांच्या एकजुटीचे दर्शन घडविणारा आदर्श उपक्रम आहे, असे प्रतिपादन भामाठाण येथील अडबंगनाथ देवस्थानचे मठाधिपती महंत अरुण गिरीजी महाराज यांनी केले.

दाढ बुद्रुक येथे सालाबादप्रमाणे हनुमंत रायाचा अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात सुरू आहे. या सप्ताहानिमित्त ग्रामस्थांच्या वतीने महंत अरुण गिरीजी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून संगीतमय नवनाथ कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कथा श्रवणासाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असून, कथा, भजन-कीर्तन आणि महाप्रसादामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला आहे. मार्गदर्शन करताना महंत अरुण गिरीजी महाराज म्हणाले की, नवनाथ चरित्र हे केवळ ऐकण्याची कथा नसून जीवन जगण्याची प्रेरणा देणारे साधन आहे. नवनाथांच्या कार्यामागील समाजकल्याणाची भूमिका समजून घेतल्यास अध्यात्म, परंपरा आणि समाजप्रबोधनाचा त्रिवेणी संगम त्यामध्ये दिसून येतो. त्यांच्या विचारांतून संकटांवर मात करण्याची प्रेरणा मिळते.



दाढ बुद्रुकची भूमी संत-महंतांच्या पदस्पर्शाने पावन झाली असून, ग्रामस्थांनी अध्यात्माची परंपरा जपली आहे. या उपक्रमामुळे गावातील बंधुभाव व सामाजिक एकात्मता अधिक दृढ होत असल्याचेही त्यांनी सांगितले. संत मुकुंदास महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत वरद विनायक सेवाधामचे मठाधिपती महंत गुरुवर्य उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या कृपाशीर्वादाने हा सोहळा होत आहे. अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता मंगळवारी (दि. २५ ऑगस्ट) सकाळी ११ वाजता महंत अरुण गिरीजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. कथा सोहळा, कीर्तन व महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

# मुख्याध्यापकांना 'अन्न व्यावसायिक' म्हणून नोंदणीची सक्ती अन्यायकारक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शाळांमध्ये पोषण आहार योजनेअंतर्गत मुख्याध्यापक व शिक्षकांच्या वैयक्तिक नावावर 'अन्न व्यावसायिक' म्हणून परवाना अथवा नोंदणी करण्याची सक्ती केली जात असल्याच्या प्रकाराला महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेनेने तीव्र विरोध दर्शविला आहे. मुख्याध्यापक हे शैक्षणिक व प्रशासकीय अधिकारी असून, ते अन्न उत्पादक, व्यावसायिक किंवा कंत्राटदार नसल्याचे जिल्हाध्यक्ष शशिकांत थोरात व सरचिटणीस मंगेश पालवे यांनी स्पष्ट केले.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत मुख्याध्यापकांवर वैयक्तिक कायदेशीर जबाबदारी टाकणे अन्यायकारक असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. धान्याची गुणवत्ता, साठवणूक, स्वयंपाकघर, पाणी व गॅस व्यवस्था यांसारख्या संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी मुख्याध्यापकांवर लादल्यास त्यांच्यावर अनावश्यक कायदेशीर जोखीम निर्माण होईल, असा दावा संघटनेने केला आहे.

मुख्याध्यापक किंवा शिक्षकांच्या वैयक्तिक नावावर नोंदणी न करता संबंधित शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा अधिकृत अन्न पुरवठादार संस्थेच्या नावाने परवाना देण्यात यावा. मुख्याध्यापकांना केवळ योजनेच्या अंमलबजावणी व देखरेखीची प्रशासकीय जबाबदारी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्नधान्याच्या गुणवत्तेत त्रुटी आढळल्यास मुख्याध्यापकांना जबाबदार न धरता संबंधित दोषी पुरवठादार किंवा कंत्राटदारावर कठोर कारवाई करावी. तसेच पोषण आहाराच्या अतिरिक्त प्रशासकीय कामामुळे शिक्षकांचे अध्यापन बाधित होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी संघटनेने केली. विद्यार्थ्यांना सुरक्षित व दर्जेदार आहार मिळण्यासाठी शासनाने अधिक सक्षम, पारदर्शक व्यवस्था उभी करावी आणि कायदेशीर व आर्थिक जबाबदारी शालेय शिक्षण विभाग व अधिकृत पुरवठादारांवर निश्चित करावी, अशी भूमिका थोरात व पालवे यांनी मांडली.

# 'बेबी केअर किट' मधून हँड वॉश, सॅनिटायझर, शॅम्पू बॉडीवॉश गायब । शासनाचा भोंगळ कारभार

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : महाराष्ट्रात दरवर्षी सुमारे २० लाख महिलांची प्रसूती होते. त्यापैकी आठ लाख महिला शहरी, तर तब्बल १२ लाख महिला आदिवासी व ग्रामीण भागातील आहेत. या महिलांना प्रसूतीनंतर नवजात बालकांच्या संगोपनासाठी २०१९ पासून 'बेबी केअर किट' दिली जाते. २ हजार रुपये किमतीची ही किट शासनाच्या प्राथमिक आरोग्य केंद्र आणि रुग्णालयांत नावनोंदणी केलेल्या महिलांना मिळते. शासन निर्णयात १७ वस्तूंची यादी असली तरी सध्या फक्त तेराच वस्तू मिळत आहेत.




गेल्या तीन वर्षांपासून शासनाने घेतलेल्या या निर्णयात कोणताच बदल झालेला नाही. लहान मुलाचे कपडे, डायपर, झोपण्याची लहान गादी, टॉवेल, थर्मोमीटर, मालिश तेल, मच्छरदाणी,गरम ब्लँकेट, प्लॅस्टिकची घटई, शॅम्पू, खेळणी, नेलकटर, हातमोजे-पायमोजे, हँडवॉश, लोकरीचे कपडे, बॉडीवॉश आणि साहित्य ठेवण्यासाठी लहान पेटी अशा या वस्तू असून मात्र गेल्या ३ वर्षांपासून या किटमधून हँड वॉश, सॅनिटायझर, शॅम्पू आणि बॉडीवॉश या ४ वस्तू मिळतच नाही.

२०१८ मध्ये शासनाने तान्ह्या बाळाच्या संगोपनासाठी गरोदर मातेला दोन हजार रुपयांची आर्थिक मर्यादा निश्चित केली. २०२३ मध्ये निविदा प्रक्रियेत १७ वस्तू या रकमेत मिळणे शक्य नसल्याचे स्पष्ट झाले. सचिवांच्या बैठकीत चार वस्तू कमी करण्याचा निर्णय झाला मात्र याबाबत कोणताही सुधारित शासन निर्णय, प्रसिद्धीपत्रक किंवा परिपत्रक काढण्यात आले नाही. त्यामुळे ३ वर्षे उलटूनही शासनाच्या या बेफिकिरी मुळे गरोदर माता या वस्तूंची आतुरतेने वाट पाहत आहे.

# पिंपरी लौकी-अजमपूरच्या विकासाला गती

## ब्राह्मण ओढा खोलीकरणासाठी २१ लाखांचा निधी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या पंधरा वर्षांत पिंपरी लौकी-अजमपूर गावाच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळाली असून, गावाची आदर्श गावाच्या दिशेने वाटचाल सुरू आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व जनसेवा मंडळाचे अध्यक्ष भारत गीते यांनी केले. पिंपरी लौकी-अजमपूर येथील ब्राह्मण ओढ्याचे खोलीकरण व मजबुतीकरण करण्यासाठी २१ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या कामाचा शुभारंभ भारत गीते यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कार्यकर्ते तथा अश्विनी पतसंस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब लावरे होते. गीते म्हणाले की, शिर्डी विधानसभा मतदारसंघात गावाचा समावेश झाल्यानंतर विकासाला गती मिळाली. राधाकृष्ण विखे, युवा नेते डॉ. सुजय विखे आणि जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे यांच्या प्रयत्नांतून गावातील पिण्याचे पाणी, जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, जिल्हा परिषद शाळा तसेच आरोग्य सुविधांसाठी निधी मिळाला आहे. भविष्यात गावासाठी सांस्कृतिक भवन, स्वतंत्र तलाठी कार्यालय, वीरभद्र व गणपती मंदिरासाठी सभामंडप, पशुवैद्यकीय दवाखाना आणि राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. ब्राह्मण ओढ्याच्या खोलीकरणामुळे अनेक शेतकऱ्यांना फायदा होणार असून, ओढ्याला कायमस्वरूपी पाणी उपलब्ध होण्यासाठी एस.के.एफ. वॉल उभारण्यासाठीही प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी प्रा. अशोकराव गीते, बाजीराव गीते, भाऊसाहेब मुंढे, भीमराज गीते, गोवर्धन गीते, प्रशांत तांबे यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. अशोकराव गीते यांनी केले, तर आभार भाऊसाहेब लावरे यांनी मानले.

# केशव गोविंद हरिनाम सप्ताह व कीर्तन महोत्सवनिमित्त आज शोभयात्रा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : ग्रामदैवत हरिहर केशव गोविंद भगवान अखंड हरिनाम सप्ताह आणि कीर्तन महोत्सवानिमित्त आज दुसऱ्या सोमवारी जलाभिषेक व शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच उद्या मंगळवारी काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे. बेलापूर येथील केशव गोविंद मंदिरात दरवर्षी श्रावण महिन्यात हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही हरिनाम सप्ताह आणि कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यनिमित्त ग्रन्थराज ज्ञानेश्वरी पारायण व हरिपाठ आणि कीर्तन असे सप्ताहचे स्वरूप होते. आज दुसऱ्या श्रावण सोमवार निमित्त सकाळी गोदा जलाभिषेक, दुपारी तीन वाजता शुभयात्रा काढण्यात येणार आहे. उद्या मंगळवारी कल्याचे कीर्तन व त्यानंतर महाआरती आणि महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

# आमदार खताळ-लंघे भाविकांमध्ये मिसळले; पंक्तीत बसून घेतला महाप्रसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : राजकीय पदाचा कोणताही बडेजाव न ठेवता संगमनेरचे आमदार अमोल खताळ व नेवासाचे आमदार विठ्ठलराव लंघे यांनी सर्वसामान्य भाविकांमध्ये मिसळून राहाता तालुक्यातील धनगरवाडी येथे सुरू असलेल्या योगीराज गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहात सहभाग घेतला. दोन्ही आमदारांनी महिला-पुरुष भाविकांसोबत पंक्तीत बसून महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

धनगरवाडी येथील सप्ताहस्थळी आमदार खताळ, आमदार लंघे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कमलाकर कोते, पंचगंगा उद्योग समूहाचे प्रमुख प्रभाकर शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांनी भेट देऊन संत गंगागिरी महाराजांचे दर्शन घेतले.

यावेळी मान्यवरांनी रामगिरी महाराज यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. रामगिरी महाराज यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा योगीराज गंगागिरी महाराजांची शाल देऊन सन्मान करण्यात आला. सप्ताहाच्या निमित्ताने आमदार खताळ व आमदार लंघे यांनी भाविकांशी संवाद साधत त्यांच्या भावना व अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर त्यांनी सर्वसामान्य भाविकांसोबत पंक्तीत बसून महाप्रसाद घेतला. त्यांच्या या साधेपणाचे उपस्थित भाविकांनी कौतुक केले.

धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांमुळे समाजातील विविध घटक एकत्र येऊन एकोपा, बंधुभाव व संस्कारांची भावना दृढ होते. अशा सप्ताहांमधून समाजात आपुलकीचे वातावरण निर्माण होते, असे आमदार अमोल खताळ व आमदार विठ्ठलराव लंघे यांनी सांगितले.

या प्रसंगी बाळासाहेब पवार, राहुल गोंदकर, महेश महाले, संतोष जाधव, सरूनाथ उंबरकर, अभिजीत पुंड यांच्यासह भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



---

## पान १ वरुन

### २०२९ मध्येच 'एक देश, एक निवडणूक'ची चाचपणी?

घ्याव्या लागतील. गोवा, उत्तराखंड, हरियाणा आणि दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच एकत्रित निवडणुकांना पाठिंबा दर्शविला आहे. गोवा, गुजरात, मणिपूर, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, छत्तीसगड, मध्य प्रदेश, मेघालय, नागालँड, राजस्थान आणि त्रिपुरा या राज्यांत पुढील दोन वर्षांत विधानसभा निवडणुका होणार असल्याने मुदतपूर्व निवडणुकीचा पर्याय चर्चेत आहे.

दरम्यान, काँग्रेस नेते पवन खेडा यांनी भाजपचे हे नॅरेटिव्ह फेल होईल, असा दावा केला. 'जेन झी'ने सरकारची प्रत्येक स्क्रिप्ट उधळून लावल्याचा टोलाही त्यांनी लगावला. 'एक देश, एक निवडणूक'ला काँग्रेसचा सुरुवातीपासून विरोध असल्याने विधेयक मंजूर करण्याचे आव्हान सरकारसमोर कायम राहणार आहे.

### दहा वर्षे पूर्ण केलेल्या संचालकांना निवडणुकीतून 'डच्चू' नाही!

कायदेशीर अभिप्राय घेतला.या अभिप्रायात बँकिंग नियमन कायद्यातील तरतूद राज्य सरकारने स्वीकारलेली नसताना, केवळ तिच्या आधारे दहा वर्षे पूर्ण केलेल्या संचालकांना निवडणुकीपासून रोखण्याचा अधिकार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या निर्णयामुळे अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत दहा वर्षे पूर्ण केलेल्या अनेक ज्येष्ठ संचालकांना मोठा दिलासा मिळाला असून, आता बँकेच्या निवडणुकीतील राजकीय समीकरणांनाही नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.

### २२ फुटांची भुलेश्वर राजा गणेशमूर्ती कोसळली

चाक मंडपाजवळील खड्ड्यात गेल्याने ट्रॉलीचा तोल गेल्याचा दावा केला जात आहे. मात्र, दुर्घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या कारणांबाबत पोलीस अथवा प्रशासनाकडून अधिकृत पुष्टी झालेली नाही. पोलिसांकडून या प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

गणेशमूर्तीच्या आगमनासाठी मोठ्या उत्साहात मिरवणूक काढण्यात आली होती. ढोल-ताशांचा गजर आणि भाविकांच्या गर्दीत मूर्ती मंडपाकडे नेली जात असतानाच अचानक ती कोसळली. काही क्षणांतच आनंदाचे वातावरण आक्रोशात बदलले. या दुर्घटनेमुळे गणेशोत्सवातील मोठ्या मूर्तींच्या वाहतूक आणि सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

---

# साखरेने सत्तरी गाठली; रक्षाबंधनच्या गोडीत महागाईचा कडवटपणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : महागाईने आधीच सर्वसामान्यांचे आर्थिक बजेट कोलमडले असताना सणासुदीच्या तोंडावर साखरेच्या दराने सत्तरीचा टप्पा गाठल्याने नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे. रक्षाबंधन सण अवघ्या काही दिवसांवर आला असून, साखरेसह दूध, तूप, ड्रायफ्रूट्स आणि अन्य साहित्याच्या वाढत्या दरामुळे मिठाई व घरगुती गोड पदार्थांच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाच्या रक्षाबंधनच्या गोडीत महागाईचा कडवटपणा जाणवणार आहे.

रक्षाबंधन म्हटले की बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधणे, औक्षण करणे आणि मिठाई भरविणे हा आनंदाचा क्षण असतो. मात्र मिठाईच्या वाढत्या किमतीमुळे सर्वसामान्य कुटुंबांना सणाचा खर्च सांभाळताना काटकसर करावी लागण्याची शक्यता आहे.

**आगामी सणांवरही परिणाम**

रक्षाबंधननंतर गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दसरा आणि दिवाळी असे सण लागोपाठ येणार आहेत. त्यामुळे साखरेच्या दरवाढीचा परिणाम लाडू, करंजी, मिठाई, चिवडा यांसह विविध खाद्यपदार्थांच्या किमतीवर होण्याची शक्यता आहे. सणासुदीचा वाढता खर्च कसा भागवायचा, असा प्रश्न सर्वसामान्य कुटुंबांसमोर उभा राहिला आहे.

---

# केंद्रीय मंत्री आठवले यांच्या उपस्थितीत आज राजाभाऊ कापसे यांची शोकसभा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी** : अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील वाकडी येथील रहिवासी असलेले सामाजिक कार्यकर्ते,दलीत चळवळीत मोठे योगदान असलेले आरपीआयचे महाराष्ट्र राज्य सचिव राजाभाऊ कापसे यांचे वयाच्या ५७ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने नुकतेच दुःखद निधन झाले. सोमवार दि २४ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता राहाता तालुक्यातील वाकडी येथे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले साहेब व पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील तसेच माजी मंत्री,आमदार खासदार, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत



राजाभाऊ कापसे यांच्या शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

नेहमी सामाजिक चळवळीत असलेले राजाभाऊ कापसे यांनी गेली २५ ते ३० वर्षापासून अन्याय विरूद्ध आवाज उठवून लोक हक्कासाठी, सामाजिक विषयावर आंदोलन केले, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार रामदासजी आठवले साहेब यांच्या सोबत राजाभाऊ कापसे यांनी चळवळीत भाग घेतला होता ना रामदासजी आठवले साहेब यांचे ते विश्वासू सहकारी होते जन्मभूमी असलेल्या वाकडी गावात व श्रीरामपूर शहरासह खेड्यापाड्यात राजाभाऊ कापसे यांनी आरपीआयच्या माध्यमातून विविध सामाजिक, धार्मिक उपक्रम राबविले गोरगरिबांना वेळोवेळी मदत केली, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त प्रत्येक वर्षी राजाभाऊ कापसे यांनी मोफत अन्नदान केले,गरजू व्यावसायिकांना व्यवसाय उभा करण्यासाठी मदत केली अगदी लहान थोरापर्यंत राजाभाऊ कापसे यांनी आपली कार्यशीलता जपत कौतुकाची थाप मिळविली. आरपीआय पक्षाच्या माध्यमातून दहा वर्षात मोठे संघटन तयार करून गाव देश व पक्षहिताचे काम राजाभाऊ कापसे यांनी केले. एक होतकरू, लढाऊवृत्ती,नेहमी चळवळीत सहभाग असणारे व्यक्तिमत्व राजाभाऊ कापसे यांच्या निधनाने दलीत चळवळीचे मोठे नुकसान झाले असून राजाभाऊ कापसे यांच्या दुःखद निधनाबाबत नातेवाईक, आरपीआयचे पदाधिकारी,आप्तेष्ट, हितचिंतक व परिसरातील नागरिकांनी दुःख व्यक्त केले.

---

# शिवसेनेच्या वतीने पर्मनंट सुरक्षा रक्षक भरती सुरु

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : सूक्ष्म लघु मंत्रालय भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत आणि भारत सरकारच्या पसारा ॲक्ट २००५ च्या नियमाप्रमाणे स्थानिक तरुणांसाठी कायमस्वरूपी नोकरीसाठी आयएसओ मान्यताप्राप्त, भारत सरकारच्या पसारा मान्यताप्राप्त शिवस्वराज्य सेक्युरिटी अँड मॅन पॉवर सर्विसेस प्रा. लिमिटेड आणि मा. नीरज भैया मुरकुटे. संचालक अशोक सहकारी साखर कारखाना. तसेच शिवसेना श्रीरामपूर.जि. अहिल्यानगर यांच्या वतीने दिनांक २६ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट २०२६ पर्यंत सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या भरतीस बेरोजगार युवकांना पर्मनंट नोकरीं दिली जाणार आहे. त्याचबरोबर. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेच्या (झचतइठध) अंतर्गत नवीन भरती होणाऱ्या युवकांना नोकरी लागल्यानंतर १५००० रुपये मिळतील. जे पेमेंट व्यतिरिक्त सरळ त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होतील. तसेच इतर सुविधा ज्यामध्ये पी एफ सुविधा, मेडिकल, ग्रॅजुटी, पी एफ पेन्शन, विधवा पेन्शन, अनाथ पेन्शन व नियमानुसार भत्ते दिले जातील, तसेच पेमेंट हे महाराष्ट्र गार्ड बोर्ड किंवा महाराष्ट्र मिनिमम वेज नियमाप्रमाणे पेमेंट मिळणार आहे जे १५ हजार ते २४हजार पर्यंत सुरुवातीस मिळेल व सर्व सूविधा दिल्या जातील. भरती होणाऱ्या तरूणांना महाराष्ट्रामध्ये मध्ये नौकरी दिली जाणार आहे,

ही भरती प्रक्रिया दि.२६ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट २०२६ पर्यंत सकाळी ८ ते दुपारी१ पर्यंत स्वागत लॉन्स. नेवासा रोड, प्रगतीनगर, श्रीरामपूर .ता.श्रीरामपूर जि. अहिल्यानगर येथे सुरू राहणार आहे. तरी २९ ऑगस्ट पर्यंत या सुवर्ण संधीचा लाभ जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी लाभ घ्यावा.

---

# घोडेगाव सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी अन्सार शेख व्हाईस चेअरमनपदी संदीप सोनवणे यांची बिनविरोध निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घोडेगाव** : येथील सेवा सोसायटीच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदासाठी मंगळवारी (दि. १८ ऑगस्ट) नेवासा येथील सहाय्यक निबंधक कार्यालयात निवड प्रक्रिया पार पडली. यात नेवासा पंचायत समितीचे माजी उपसभापती दिलीप लोखंडे व मुळा कारखान्याचे नूतन संचालक दत्तात्रय ब-हाटे यांच्या गटाचे अन्सार ईसाक शेख यांची चेअरमनपदी, तर संदीप प्रकाश सोनवणे यांची व्हाईस चेअरमनपदी निवड झाली.

चेअरमन पदासाठी लोखंडे-ब-हाटे गटाकडून अन्सार शेख, तर विरोधी गटाकडून राजेश नानासाहेब रेपाळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तेरा संचालकांनी गुप्त मतदान केले. यात अन्सार शेख यांना नऊ, तर राजेश रेपाळे यांना चार मते मिळाली. पाच मतांच्या फरकाने शेख यांचा विजय झाला. दरम्यान, विरोधी गटाने व्हाईस चेअरमन पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल न केल्याने संदीप सोनवणे यांची बिनविरोध निवड झाली. राजेश रेपाळे हे गेल्या तीन पंचवार्षिकपासून संस्थेचे संचालक असून, यापूर्वी दोन वेळा चेअरमन राहिले आहेत. यावेळी मात्र त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

निवडीनंतर अन्सार शेख व संदीप सोनवणे यांचा दिलीप लोखंडे, दत्तात्रय ब-हाटे, बाळासाहेब सोनवणे, राजेंद्र सोनवणे, आजिम शेख, सद्दाम शेख यांच्यासह समर्थकांनी शाल, श्रीफळ, फेटा व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. सभासदांच्या हितासाठी तसेच संस्थेच्या विकासासाठी प्रामाणिकपणे प्रयत्नशील राहू, असे नूतन चेअरमन अन्सार शेख यांनी सांगितले.

---

# राहुरी शहरातील शुक्लेश्वर या पुरातन मंदिराच्या जीर्णोद्धार कामास सुरुवात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शहरात असणाऱ्या सुमारे १५० वर्षांपेक्षा प्राचीन अशा शुक्लेश्वर मंदिराचे आता रूप पालटणार असून राहुरी शहरात शुक्लेश्वर चौकात भव्य असे पंचमुखी महादेवाचे मंदिर नवीन रूपात साकारले जाणारआहे. या मंदिराचा कळस, आणि गर्भगृहातील पंचमुखी महादेवाचे शिवलिंग व इतर देव देवतांच्या मुर्तीमध्ये सर्व ग्रामस्थ व भाविक भक्तांचा दानधर्म रूपाने काहीतरी सहभाग असावा यासाठी आर्थिक अथवा वस्तुरुपात मदतीचे विनम्र आवाहन शुक्लेश्वर मंदिर देवालयाच्या ट्रस्टने भाविक भक्तांना केले आहे.

राहुरी शहरातील कासार गल्ली राहुरी येथील अनेक भक्तांचे श्रध्दास्थान व जागृत असे देवस्थान श्री शुक्रेश्वर मंदिराचे गर्भगृहाचे तसेच कलशाचे कामाने वेग घेतला आहे. या मंदिरासाठी आतापर्यंत अनेक भाविकांनी दिलेल्या देणगीतून मंदिराचे सुंदर व मनमोहक रूपाने आता पुर्णत्वास येत आहे. शहरातील सर्वच स्तरातील लोक, व्यापारी, नोकरदार वर्ग दान धर्म करणारे भाविक भक्त राहुरी येथुन नोकरीनिमित्ताने किंवा अन्य कारणाने बाहेरगावी गेलेले रहिवासी तसेच राहुरी येथील आई तुळजाभवानीचे माहेर म्हणून राहुरी प्रसिद्ध आहे त्यामुळे तुळजाभवानीचे माहेरवाशीन असलेल्या भाविकांनी सुद्धा त्यांच्या ईच्छेप्रमाणे वस्तुरुपात व आर्थिक स्वरुपात भरभरुन दान दिलेले आहे. विशेष बाब म्हणजे आतापर्यंत या मंदिरास मदतीचा ओघ कधीही थांबलेला नाही. जसा जसा मंदिराला आकार येत आहे तसे तसे दान धर्म करणाऱ्यांचे प्रमाणही वाढत चालले आहे. त्यामुळे मंदिर लवकरच पूर्णत्वास येत असून राहुरी शहरातील पुरातन काळातील एक भव्य दिव्य असे मंदिर उभारले जात असून यामुळे राहुरी शहराची ख्याती अजूनच पसरणार आहे.

महाराष्ट्रातील एकमेव मंदिर राहू केतू यांचे पौराणिक कथेत असलेल्या आख्यायिका प्रमाणे आई तुळजाभवानीचे माहेर म्हणून राहुरी महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. व त्यातच या पुरातन शुक्लेश्वर मंदिराची भव्य अशी ऐतिहासीक कालीन मंदिराची भव्य अशी प्रतिकृती उभी राहत असून या मंदिरामुळे राहुरी शहराच्या नावलौकिकात अजून भर पडणार आहे. या मंदिराला प्रसिद्ध अशा कारागिरांनी कोरीव काम करून विशेष असे सुंदर शिल्प रुपी आकार दिला आहे या पुरातन मंदिरामध्ये पुर्वी ज्या देव देवतांच्या मूर्ती स्थापित होत्या त्याच आता नव्याने स्थापित होणार असून त्यामध्ये श्रीगणेश; पंचमुखी महादेव आणि नंदी; श्री गुरुदेव दत्त; श्रीराम दरबार; विठ्ठल रुक्मिणी; दुर्गा माता; वीर हनुमान, श्री साईबाबा या देवतांचा समावेश आहे. या सर्व देवतांच्या मुर्ती साठी जयपुर येथील प्रसिध्द मुर्तीकार ज्यांनी श्रीक्षेत्र अयोध्या येथील श्रीराम मंदिरामध्ये मुर्त्या घडविल्या आहेत त्यांना ऑर्डर देण्यात आलेली आहे. कलश व मुर्तीमध्ये सर्व ग्रामस्थांचा, भाविक भक्तांचा सहभाग असला पाहिजे आणि त्यामुळे सर्व भाविक भक्तांना मंदिराच्या कळस व मुर्तीसाठी मदतीचे विनम्र आवाहन करण्यात येत आहे. मंदिरामध्ये श्रावण महिना असल्याने नेहमीप्रमाणे दर सोमवारी दुपारी १२.०० वाजता महादेवाची महाआरती होत असते. सदर आरतीसाठी राहुरी शहरातील भाविक भक्तांनी उपस्थित रहावे अशी विनंती भ्रष्टाचार वतीने करण्यात येत आहे.

---

# गुजरातच्या १२० सहकार प्रतिनिधींची समता मुख्यालयाला सदिच्छा भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : गुजरात राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन उपाध्यक्ष डॉ.जीवराजभाई गोधानी, संचालक अल्पेश धामेलिया, सीईओ दुष्यनसिंह वाघेला, सुरत जिल्हा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी फेडरेशन एम.डी. रमेशभाई लाठीया, संचालक मंडळ आणि गुजरातमधील विविध सहकारी पतसंस्थांचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक आदींसह १२० प्रतिनिधींनी २२ ऑगस्ट २०२६ रोजी समता पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयास सदिच्छा भेट दिली. प्रसंगी जेठालाल पटेल, अशोकशेठ जानी यांनी कोपरगाव गुजराती मित्रमंडळाच्या वतीने पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या आत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सेवा, आधुनिक बँकिंग प्रणाली आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची सविस्तर माहिती प्रतिनिधींना देण्यात आली.




गुजरातमधून आलेल्या प्रतिनिधींना संस्थेच्या कार्याची माहिती त्यांच्या भाषेत समजावी, यासाठी समता पतसंस्थेचे व्हा.चेअरमन अरविंद पटेल व संचालिका सौ.अक्षरा अनुप पटेल यांनी चित्रफितीच्या माध्यमातून गुजराती भाषेत विविध सेवा व उपक्रमांचे सादरीकरण केले. गुजराती भाषेतून समता विषयी परिपूर्ण माहिती मिळाल्याबद्दल उपस्थित पदाधिकाऱ्यांनी संचालिका सौ अक्षरा अनुप पटेल यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. संस्थेच्या कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कशा पद्धतीने केला जातो, याचा परिचय या माध्यमातून करून देण्यात आला.

समता पतसंस्थेने विकसित केलेल्या सेल्फ बँकिंग, व्हाउचरलेस बँकिंग, ऑडिट कंट्रोल रूम, ऑनलाइन समता रिकव्हरी पॅटर्न, पेपरलेस बँकिंग आणि मोबाईल बँकिंग या सुविधांची माहिती प्रतिनिधींना देण्यात आली. व्यवहारांमध्ये अचूकता, पारदर्शकता आणि गतिमानता आणण्यासाठी या प्रणालींचा उपयोग केला जात असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

संस्थेच्या विविध सुविधा व उपक्रमांबरोबरच तालुक्यातील महिला बचत गटातील महिलांना एक हक्काचे केंद्र उपलब्ध करून दिलेले 'सहकार उद्योग मंदिर' आणि 'समता सहकार मिनी मॉल' ची संकल्पना व कार्य याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक जितूभाई शहा, कचरू मोकळ, अश्विन व्यास यांच्यासह मुख्य कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

## निधन वार्ता

### शिवाजीराव खुरूद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** देवळाली प्रवरा येथील प्रगतशील शेतकरी शिवाजीराव लक्ष्मण खुरुद (वय ७६) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. डॉ. तनपुरे कारखान्याचे संचालक अशोक खुरुद व मा नगरसेवक बाळासाहेब खुरुद यांचे चुलते तसेच सुधीर खुरुद यांचे वडील होत.

---

# विखे परिवाराकडून अखंड हरिनाम सप्ताह कमिटीकडे १०१ साखर पोती सुपूर्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहाता** : तालुक्यातील धनगरवाडी येथे सद्गुरू महंत गंगागिरीजी महाराज यांच्या १७९व्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या वतीने १०१ साखर पोती सप्ताह कमिटीकडे सुपूर्त करण्यात आली. धार्मिक आणि सामाजिक परंपरा मध्ये योगदान देण्याची विखे पाटील परिवाराची सक्रीयता पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

धनगरवाडी येथे आयोजित करण्यात आलेला अखंड हरिनाम सप्ताह हा परिसरातील भाविकांसाठी श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा मोठा सोहळा आहे. सप्ताहाच्या आयोजनासाठी आवश्यक असलेल्या साखरेची गरज लक्षात घेऊन पद्मश्री डॉ विठ्ठलराव



विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या वतीने १०१ साखर पोती सप्ताह कमिटीकडे सुपूर्त करण्यात आली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनातून यंदाच्या सप्ताहामध्ये योगदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.विखे पाटील परिवाराने जिल्ह्यातील धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांसह वारकरी सांप्रदाया मध्ये नेहमीच योगदान आणि सहकार्य करण्याची परंपरा कायम ठेवली आहे. धनगरवाडीतील या भक्तिमय सोहळ्यालाही कारखान्याच्या माध्यमातून मोलाचे सहकार्य करण्यात आले.

यावेळी विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सोपानराव शिरसाठ, एम.डी. महेश कोनापुरे, संचालक लाटे पाटील, ताटे पाटील, यादव पाटील यांच्यासह कारखान्याचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि सप्ताह कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

धार्मिक परंपरा जपत समाजाशी असलेले जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ करण्याचे काम विखे पाटील परिवार सातत्याने करत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून धनगरवाडी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, सप्ताह कमिटीकडे करण्यात आलेल्या या सहकार्याबद्दल आयोजक आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

---

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

सोमवार दि . २४ ऑगस्ट २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२९ ४८० ६६० | २-४ | १३० १४९ ११२ | २७-०४-३१-९८-४५ |

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १७९ २७८ ११५ | ७-६ | १५० २४० ३३० | ७४-३६-१०-५८-६२ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १५८ २४८ ११० | ४-१ | १३२ ३८० ३३५ | ४०-७१-२३-६८-१९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 233 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 250 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 350 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 17/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 24/08/2026 | 240 6 | | | | |

## द•ख•ल



## १९ खेळाडूंना सुवर्णपदक तर एका खेळाडूला सिल्व्हर

**अहिल्यानगर :** वाडिया पार्क क्रीडा संकुल येथे महाराष्ट्र राज्य कुस्ती संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये नगर शहरातील खेळाडूंनी विविध वजन गटामध्ये १९ सुवर्णपदक व एक सिल्व्हर पदक पटकावले. या गुणवंत खेळाडूंचा सत्कार आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी प्रशिक्षक प्राध्यापक संजय धोपावकर, प्राध्यापक माणिक विधाते, पैलवान अनिल वाणे, आदित्य धोपावकर, शुभम दातरंगे, युवराज करंजुले, गोरख खंडागळे, अथर्व नरसाळे, निलेश मदने, प्रकाश बल्लाळ आदींसह खेळाडू, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आ. संग्राम जगताप म्हणाले की, विद्यार्थ्यांनी बाल वयातच शालेय शिक्षण घेत असतानाच आपल्या आवडीच्या क्रीडा स्पर्धेचे धडे घ्यावेत. क्रीडा क्षेत्रामध्ये करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध असून, जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यश संपादन करता येत असते. आपल्या अहिल्यानगर शहरांमध्ये सारसनगर व गंगा उद्यान येथे क्रीडा संकुल उभारले असून, या ठिकाणी खेळाडूंच्या कलागुणांना वाव देता येईल.

## प्रत्येक जिल्ह्यात वडार भवन उभारणार : विजय गोरे



**अहिल्यानगर :** वडार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि मूलभूत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी वीर वडार एकता फाऊंडेशन महाराष्ट्र राज्याच्या जनसंपर्क दौरा व संघटनात्मक अभियानाचा शुभारंभ केडगाव येथील अर्चना हॉटेलमध्ये करण्यात आला. समाजाच्या विविध प्रश्नांवर राज्य सरकारकडे आवाज उठविण्यासोबतच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वडार भवन उभारून त्या माध्यमातून समाजाचे प्रश्न मार्गी लावण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विजय गोरे म्हणाले की, राजकीय पक्षांतील नेते आणि विविध संघटनांनी वडार समाजाला कुठे नेऊन ठेवले आहे, असा प्रश्न आजही उपस्थित होतो. समाज मूलभूत प्रश्नांपासून दूर आहे. त्यामुळे समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकारकडे ठामपणे आवाज उठविण्यात येणार आहे. समाजाचे प्रश्न ऐकून घेण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात वडार भवन उभारण्यात येईल आणि त्या माध्यमातून समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम केले जाईल. समाजातील गोरगरीब कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी दिवाळीच्या सणादरम्यान राज्यस्तरीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचेही गोरे यांनी सांगितले. वडार समाजावर होणारा अन्याय आणि अत्याचार यापुढे खपवून घेतला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगड किल्ला हिरोजी इटळकर यांनी उभा केला असून, वडारी भाषेत दगडाला 'राय' म्हणतात. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी या किल्ल्याला रायगड हे नाव दिले, असा इतिहास लपविण्यात आला असल्याची भूमिका विजय गोरे यांनी व्यक्त केली.

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आज अहिल्यानगर दौऱ्यावर

**अहिल्यानगर :** केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय नेते ना. रामदास आठवले सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत



आहेत. रिपब्लिकन पक्षाचे राज्य सचिव लोकनेते राजाभाऊ कापसे यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी ना. आठवले वाकडी (ता. राहाता) येथे भेट देणार आहेत. या दौऱ्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांनी दिली. ना. रामदास आठवले हे दिल्लीहून विमानाने छत्रपती संभाजीनगर विमानतळावर सकाळी ११ वाजता दाखल होणार आहेत. त्यानंतर श्रीरामपूरमार्गे वाकडी येथे ते दुपारी सुमारे १२ वाजता पोहोचणार आहेत. येथे लोकनेते राजाभाऊ कापसे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन ते सांत्वन करणार आहेत. यानंतर वाकडी येथे सर्वपक्षीयांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शोकसभेला ना. रामदास आठवले उपस्थित राहणार आहेत. यावेळी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने लोकनेते राजाभाऊ कापसे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. कापसे यांच्या सामाजिक व राजकीय योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात येणार असल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## उडाणच्या कार्यक्रमात सामाजिक कार्याचा जागर



**अहिल्यानगर :** स्पर्धा आपल्याला प्रगतीचा मार्ग दाखवते. स्पर्धेमुळे स्वतःमधील कौशल्य सुधारण्याची संधी मिळते. कष्टाची सवय लागते. आपल्या कामाचा दर्जा सुधारतो. स्वयंमूल्यमापन होऊन आत्मविश्वास निर्माण होतो, असे प्रतिपादन कुस्तीतील आंतरराष्ट्रीय खेळाडू व सुवर्णपदक विजेत्या पै. डॉ. शबनम शेख यांनी केले. माय भारत, जिल्हा क्रीडा कार्यालय, उडाण फाउंडेशन संलग्न जय असोसिएशन ऑफ एनजीओ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात स्वच्छता पखवाड्यानिमित्त देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा, नृत्य स्पर्धा तसेच 'महाराष्ट्राची लोकधारा' या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास पुणे येथील ज्येष्ठ विधीज्ञ ड. प्रशांत साळुंके, अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे संचालक मेहरनाथ कलचुरी, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, जय असोसिएशन ऑफ एनजीओचे राज्य अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, उडाणच्या अध्यक्षा आरती शिंदे, शासनाचा राज्य आदर्श युवती पुरस्कार विजेत्या जयश्री शिंदे, ॲड. अनिता दिघे, ॲड. दिनेश शिंदे आदी उपस्थित होते.

# वांबोरी चारीला पाणी; खरीपाला पाण्यासाठी महावितरणचा 'ब्रेक'!

### पिके करपण्यास सुरुवात; विजेच्या लपंडावाने बळीराजा हतबल; संतापाची भावना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** पावसाने दडी मारल्याने आधीच संकटात सापडलेल्या बळीराजाला वांबोरी चारीचे पाणी मिळाल्याने काहीसा दिलासा मिळाला. आमदार अक्षय कर्डिले यांच्या प्रयत्नातून शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या सहकार्याने वांबोरी चारीला पाणी सोडण्याचा निर्णय झाला. चारीला पाणीही आले मात्र आता महावितरणच्या विजेच्या लपंडावाने शेतकऱ्यांच्या आनंदावर अक्षरशः विरजण पडले आहे.

पावसाने पाठ फिरवल्याने

**वाफ्यात पाणी गेले की लगेच वीज जाते. विजेच्या लपंडावामुळे पिके डोळ्यांसमोर कोमेजत आहेत. वांबोरी चारीला पाणी आले असले तरी विजेचा खेळ खंडोबा सुरू आहे. पाणी पिकांच्या मुळापर्यंत पोहोचणार कसे हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.**

खरीप पिकांना सध्या पाण्याची नितांत आवश्यकता आहे. सोयाबीन, बाजरी, मका यासह विविध पिके पाण्याअभावी कोमेजण्यास सुरुवात झाली आहे. अशा परिस्थितीत चारीचे पाणी शेतकऱ्यांसाठी मोठा आधार



ठरणार असताना विद्युत पंप सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली वीजच नियमित मिळत नसल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण झाली आहे. पूर्ण दाबाने वीज मिळत नसल्याने तसेच विजेचा लपंडाव सुरू असल्याने बळीराजा हतबल झाला आहे.

कधी वीज येते तर कधी अचानक गायब होते. अनेकदा पूर्ण दाबाने वीज मिळत नसल्याने विद्युत विद्युत पंप सुरू होत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांमधून केला जात आहे. वाफ्यात पाणी सोडले की मध्येच वीज जाते आणि पुन्हा वीज येण्याची वाट पाहत शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यामुळे पाणी असूनही पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याची विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे.

खोसपुरी, मजले चिंचोली, आव्हाडवाडी परिसरात विजेच्या लपंडावामुळे शेतकरी अक्षरशा वैतागले आहेत. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी चारीचे पाणी संकटाच्या काळातील आशेचा किरण होता. मात्र महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्यामुळे ही आशाही आता मावळताना दिसत आहे. एकीकडे पाऊस नाही दुसरीकडे चारीचे पाणी असूनही वीज नाही अशा दुहेरी संकटात बळीराजा सापडला आहे.

शेतकऱ्यांच्या हातात पाणी असूनही ते पिकांच्या मुळाशी पोहोचत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. महावितरणने किमान खरीप हंगामातील अत्यावश्यक काळात तरी सुरळीत व पूर्ण दाबाने वीजपुरवठा करावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## नगर-मनमाड महामार्गाच्या दुरावस्थेविरोधात आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

### २८ ऑगस्टला पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेचा एल्गार

**अहिल्यानगर :** निवडणुकीत मत मागायचे, सत्ता मिळवायची आणि त्यानंतर जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करायचे, ही प्रवृत्ती संसदीय लोकशाहीसाठी गंभीर धोका आहे. नगर-मनमाड राष्ट्रीय महामार्गाच्या दीर्घकाळ सुरू असलेल्या दुरवस्थेविरोधात पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता 'राष्ट्रीय मत-खतांजली' आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ड. कारभारी गवळी यांनी दिली.

नगर-मनमाड महामार्गाच्या प्रश्नावर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी आणि संबंधित मंत्रालयाने जनतेसमोर स्पष्ट, कालबद्ध व दस्तऐवजाधारित उत्तर द्यावे, ही आंदोलनाची प्रमुख मागणी आहे.

नगर-मनमाड महामार्गाच्या दुरवस्थेमुळे वाहनचालक, प्रवासी, शेतकरी, विद्यार्थी, रुग्णवाहिका तसेच स्थानिक उद्योगांना वर्षानुवर्षे अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे हा प्रश्न आता केवळ रस्त्याच्या दुरवस्थेपुरता मर्यादित राहिलेला नसून संसदीय उत्तरदायित्वाच्या कसोटीचा प्रश्न बनला आहे. महामार्गासाठी निविदा निघाल्या, करार झाले, काही करार रद्द झाले किंवा ठेकेदारांवर कारवाई झाली, तरी अंतिम प्रश्न हा आहे की, नागरिकांना सुरक्षित आणि वाहतुकीयोग्य रस्ता मिळाला का? ठेकेदार अपयशी ठरल्यास त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे; मात्र ठेकेदाराची निवड, कामावर देखरेख, गुणवत्ता नियंत्रण, पर्यायी व्यवस्था आणि प्रकल्प वेळेत पूर्ण करून घेणे ही मंत्रालयाची जबाबदारी नाही का, असा सवाल आंदोलकांनी उपस्थित केला आहे.

आंदोलनाच्या माध्यमातून केंद्रीय महामार्ग मंत्रालयाकडे नगर-मनमाड महामार्गासंदर्भात स्वतंत्र 'श्वेतपत्रिका' प्रसिद्ध करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

## आनंदऋषीजी नेत्रालय येथे लवकरच नेत्रपेढी उभारण्यात येणार : डॉ. कांकरिया

### नेत्र शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; ५५० रुग्णांची तपासणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** कत्तलखान्याच्या जागेवरील आरक्षण काढून आरोग्य मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. यासाठी समाजाने मोठा पाठिंबा दिला आहे.मानवसेवा व देशसेवा करण्याच्या उद्देशानेच आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य सुरू आहे. गेल्या आठ वर्षांपासून आनंदऋषीजी नेत्रालयाची नेत्रदीपक कामगिरी सातत्याने सुरू असून,आतापर्यंत दीड लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत.नेत्रालयाचा नावलौकिक महाराष्ट्रासह देशभरात झाला आहे. समाजातील गोरगरीब व गरजू रुग्णांना मोफत व अल्पदरात नेत्रसुविधा देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आज समाजाला नेत्रपेढीची गरज आहे. आनंदऋषीजी नेत्रालयात तज्ज्ञ व निष्णात डॉक्टरांची टीम कार्यरत आहे.येणाऱ्या वर्षात



लवकरच येथे नेत्रपेढीची उभारणी करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त स्व. कन्हैयालालजी व स्व. मानकंवरबाई कांकरिया यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.सुधाताई कांकरिया व कांकरिया परिवार यांच्या वतीने नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पियुष बाफना, सचिन बांठिया, डॉ.वसंत कटारिया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ.अशोक महाडिक, डॉ.संदीप राणे, डॉ. प्रतीक कटारिया, डॉ. विशाल तांबे, डॉ.किरण शिंदे, डॉ.नेहा भराडिया, डॉ.केतन राठोड, डॉ.विवेक पाऊलबुद्धे, डॉ. नलिनी गीते, डॉ. कौस्तुभ घोडके, डॉ.निरंजन पेहेरे, डॉ. पूनम लंकेश्वर यांच्यासह सुरज शिनगारे, किरण कवडे आदी उपस्थित होते.

डॉ. सुधाताई कांकरिया म्हणाल्या, अनुभवसंपन्नता, कौशल्य व गुरुदेवजींचा आशीर्वाद यामुळे नेत्रालयातील शस्त्रक्रिया यशस्वी होत आहेत. जीवनात आरोग्यसंपन्नता आणण्यासाठी डोळे हे महत्त्वाचे इंद्रिय आहे. डोळे निरोगी असल्यास आपण व्यवसाय करू शकतो, सहजतेने वावरू शकतो तसेच आनंदी जीवन जगू शकतो. डोळ्यांअभावी मानवाचे जीवन अत्यंत कठीण असते. भारतीय संस्कृतीने सांगितल्याप्रमाणे तमसो मा ज्योतिर्गमय - अंधाराकडून प्रकाशाकडे, दुःखाकडून सुखाकडे जाण्यासाठी दृष्टी असणे खूप महत्त्वाचे आहे.

## शहरटाकळी नळ योजना गेल्या नऊ वर्षांपासून बंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगाव :** शेवगाव तालुक्याच्या पश्चिम भागातील ढोरजळगाव परिसरातील गावांमध्ये ऐन पावसाळ्यात पावसाने ओढ दिल्याने पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. ढोरजळगाव परिसरातील ढोरजळगाव, वाघोली, आखतवाडे, आपेगाव, गरडवाडी, मळेगाव, सामनगाव ही गावे ढोरा नदीच्या पाण्यावर अवलंबून असणारी गावे आहेत. ढोरा नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या साखळी बंधार्यांमुळे शेतीचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बऱ्याच अंशी सुटला होता. परंतु यावर्षी पावसाळ्यातील तीन



महिने उलटले तरी नदीला थेंबही आला नाही. यंदा अलनिनोचा प्रभाव असल्याने अनेक गावांमध्ये पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे. या परिसरात कपाशी, तुर, कांदा ही पीके अखेरच्या घटका मोजत आहे.अनेक गावांमध्ये मुळांच्या पाटपाणी मिळते.

नुकतेच पाणी सुटले असले तरी खरीप हंगामातील पीके हातची जाणार असुन पिकांच्या वाढ खुंटली यामुळे उत्पादनात घट मोठ्या प्रमाणात होणार आहे.यावर्षी ऐन पावसाळ्यामध्ये ढोरजळगाव परिसरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे ग्रामपंचायतचे पाणीपुरवठा करणारी बोअर वेल,विहीर, यांनी तळ गाठला असून व पाणी ही मोठ्या प्रमाणात क्षारयुक्त झाले आहे.

यापूर्वी परिसरातील २७ गावांना शुद्ध पाणीपुरवठा करणारी शहरटाकळी नळ योजना गेल्या नऊ वर्षांपासून थकीत वीजबिलामुळे बंद अवस्थेत असुन या नळ योजनेचे राक्षी, क-हेटाकळी, भातकुडगाव, येथील ट्रांसफार्मरचे सुमारे ७ कोटी रुपये वीज बील थकीत असून संबंधित ग्रामपंचायतीकडून वसुली न झाल्याने ही योजना डबघाईस आली आहे. पंधराव्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतमार्फत नळ योजना,विहीर, आरो फिल्टर, यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात आला असला तरी विहीरी व कुंपननलिकेला पाणी नसल्याने पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

शासनाच्यावतीने हर घर जल या योजनेचा गाजावाजा करून सुरू झालेल्या जलजीवन मिशन योजनेचा बोऱ्या वाजला असून परिसरात अनेक गावांमध्ये पाण्याच्या टाक्यांचे काम अपूर्ण स्थितीत असून. पाईपलाईनचे कामे देखील पुर्ण झाली नाहीत. अगामी महिन्यात चांगला पाऊस न झाल्यास पाणी प्रश्न अतिशय गंभीर होणार असून मुळा धरणाच्या पाटपाणी आवर्तनातून ढोरा नदीवरील बंधारे भरण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

## गाव तिथे रिपब्लिकन सेनेची शाखा उभारणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक सक्कर चौक येथील आंबेडकर भवन येथे उत्साहात पार पडली. सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशानुसार, प्रदेशाध्यक्ष सुशील सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली आणि जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली. बैठकीत रिपब्लिकन सेनेची जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासह 'गाव तिथे शाखा' उभारण्याचा निर्धार करण्यात आला. तळागाळातील गोरगरीब, वंचित व सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न रिपब्लिकन सेनेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी नूतन जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. जिल्हा महासचिवपदी दिलीप साळवे, जिल्हा संघटकपदी प्रा. गौतम वाघमारे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुखपदी लक्ष्मण साखरे, पारनेर-श्रीगोंदा जिल्हा उपाध्यक्षपदी अशोक जाधव, कर्जत-जामखेड जिल्हा उपाध्यक्षपदी विजय साळवे, तर नगर शहर-नगर तालुका जिल्हा उपाध्यक्षपदी बाळासाहेब वाघमारे यांची निवड करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

# राशीनमध्ये ड्रेनेजचा भडका! घरात सांडपाणी

### रस्त्यावर घाणीचे साम्राज्य; प्रशासनाविरोधात नागरिक संतप्त

**ऋषभ परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** राशीन येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नगर परिसरातील ड्रेनेज व्यवस्थेचा अक्षरशः बोजवारा उडाला असून अनेक ठिकाणी ड्रेनेजलाईन तुटलेल्या, तर चेंबर चोकअप झालेल्या अवस्थेत आहेत. सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य आणि दुर्गंधी पसरली आहे. पाणी सोडल्यानंतर सांडपाणी थेट नागरिकांच्या घरात शिरत असून काही घरांमध्ये स्वयंपाकाच्या चुलीपर्यंत पाणी पोहोचत असल्याचा संतप्त आरोप रहिवाशांनी केला आहे.

एकीकडे नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नसल्याची तक्रार आहे, तर दुसरीकडे पाणी आले की ड्रेनेजच्या समस्येमुळे घरात सांडपाणी शिरत असल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कर भरायचा आम्ही आणि सुविधा कोण देणार? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून केला जात आहे.



**पेव्हर ब्लॉकच्या कामावरही प्रश्नचिन्ह**

परिसरातील पेव्हर ब्लॉकचे कामही निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. केलेल्या कामाची गुणवत्ता तपासावी, प्रत्यक्ष पाहणी करावी आणि कामात अनियमितता आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

**आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर**

ड्रेनेजचे घाण पाणी साचल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला असून नागरिकांना डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, कावीळ यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. घाण, दुर्गंधी आणि डासांच्या विळख्यात नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असताना प्रशासन नेमके कोणत्या गोष्टीची वाट पाहत आहे? असा सवाल उपस्थित होत आहे.

या परिस्थितीमुळे नागरिकांना आजारपणाचा खर्चही सहन करावा लागत असल्याने, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी ग्रामपंचायत प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**वारंवार तक्रारी करूनही प्रशासन सुस्त?**

माजी ग्रामपंचायत सदस्य अशोक जंजिरे, यांनी व अमोल जाधव, बापू उकिरडे, बाळासाहेब उकिरडे बाबा उकिरडे तसेच स्थानिक रहिवाशांनी या समस्येबाबत ग्रामपंचायत प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रारी केल्याचे सांगितले. मात्र समस्या कायम असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

**जुना कुंभारगाव रोडही घाणीच्या विळख्यात**

दरम्यान, जुना कुंभारगाव रोड परिसरातही ड्रेनेजलाईन व चेंबरची मोठी समस्या निर्माण झाली असून मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य पसरले आहे. दुर्गंधीमुळे नागरिक व व्यापारी त्रस्त झाले आहेत. विशेष म्हणजे हा मार्ग मुख्य बाजारपेठेकडे जाणारा महत्त्वाचा मार्ग असल्याने दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे या ठिकाणी तातडीने स्वच्छता करून ड्रेनेजची समस्या कायमस्वरूपी सोडवावी, अशी मागणी होत आहे.

**काम करा, अन्यथा ग्रामपंचायतीला टाळे!**

प्रशासनाने आता केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी आक्रमक भूमिका स्थानिक नागरिकांनी घेतली आहे. ड्रेनेजलाईन दुरुस्ती, चेंबर स्वच्छता, सांडपाण्याचा निचरा, परिसराची स्वच्छता आणि पेव्हर ब्लॉकच्या कामाची तपासणी तातडीने करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# साखरेच्या दरवाढीमागे २० हजार कोटींचा घोटाळा? शेट्टींचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** देशात साखरेचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही कृत्रिम टंचाई निर्माण करून अवघ्या आठवडाभरात साखरेचे दर किलोमागे २० रुपयांनी वाढविण्यात आल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी केला आहे. या दरवाढीमागे सुमारे २० हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार असल्याचा संशय व्यक्त करून त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.

शेट्टी यांनी सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीचा दाखला देत देशातील साखरेच्या साठ्याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. ऑक्टोबर २०२५ अखेर ४७ लाख टन साठा होता. त्यानंतर २०२५-२६ हंगामात २९१ लाख टन साखरेचे उत्पादन झाले. त्यामुळे एकूण उपलब्ध साखर ३३८ लाख टन होती. यापैकी आठ लाख टन निर्यात झाली, तर केंद्र सरकारने २४७ लाख टन साखर विक्रीस परवानगी दिली. त्यानंतरही ३० ऑगस्टपर्यंत ८३ लाख टन साठा शिल्लक असायला हवा, असा दावा शेट्टी यांनी केला.

मात्र, अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार सप्टेंबरअखेर केवळ ३५ लाख टन साखर शिल्लक असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे तब्बल ४८ लाख टन साखर गेली कुठे, असा सवाल शेट्टी यांनी केला आहे.दरम्यान, केंद्र सरकारने १० लाख टन कच्ची साखर आयात करण्याच्या निर्णयावरही त्यांनी आक्षेप घेतला. देशात साठा उपलब्ध असताना आयात केल्यास आगामी २०२६-२७ हंगामात साखरेचे दर घसरून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसू शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

साखरेचा कथित काळाबाजार तसेच साखर कारखानदारांच्या मागील सहा महिन्यांतील आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी शेट्टी यांनी केली आहे. पत्राच्या प्रती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. उपलब्ध साखरेचा हिशोब केंद्र सरकारने स्पष्ट करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.



# वीज सुरक्षेसाठी सीईए नियमांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** देशातील वीज व्यवस्थेची सुरक्षितता, विश्वासार्हता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या (सीईए) नियम व तांत्रिक मानकांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे मत वीज क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले.

केंद्रीय विद्युत प्राधिकरण, ऊर्जा मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (महापारेषण) यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात सीईए नियम व तांत्रिक मानकांवरील प्रादेशिक स्तरावरील एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. पश्चिम विभागातील विविध राज्यांतील वीज कंपन्या, सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील वीज उपक्रम, अधिकारी, अभियंते व तज्ज्ञ असे सुमारे १५० प्रतिनिधी कार्यशाळेत सहभागी झाले.

कार्यशाळेचे उद्घाटन केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे सदस्य (थर्मल) तसेच सदस्य (ई अँड सी) आणि भारत सरकारचे पदसिद्ध अतिरिक्त सचिव प्रवीण गुप्ता यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) दत्तात्रय पडळकर, केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे मुख्य अभियंता (नियामक व्यवहार) एल. के. एस. राठोड, एनपीसीच्या सदस्य सचिव ऋषिका शरण, महापारेषणचे कार्यकारी संचालक शशांक जेवळीकर, पीयूष शर्मा आदी उपस्थित होते.

प्रवीण गुप्ता यांनी सीईए नियमांचा उद्देश भारतीय वीज ग्रिडची सुरक्षितता, विश्वासार्हता आणि कार्यक्षमता सुनिश्चित करणे हा असल्याचे सांगितले. महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण यांनी नवीकरणीय ऊर्जेचे ग्रिडमध्ये एकत्रीकरण करण्यासाठी पारेषण जाळ्याचा सातत्याने विकास करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले. संचालक (प्रकल्प) दत्तात्रय पडळकर यांनी राज्यातील पारेषण प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी सीईए नियमांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यशाळेत विद्युत वाहिन्या व उपकेंद्रांची तांत्रिक मानके, विद्युत सुरक्षितता व पुरवठा नियम २०२३, ग्रिड कनेक्टिव्हिटी मानके, ग्रिड स्टँडर्ड्स २०१०, वितरित ऊर्जा स्त्रोतांच्या जोडणीची मानके, प्रस्तावित कनेक्टिव्हिटी नियम २०२६ तसेच वीज क्षेत्रातील सायबर सुरक्षा नियम २०२६ यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. प्रश्नोत्तर व अभिप्राय सत्रानंतर केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे उपसंचालक संदीप कुमार यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यशाळेची सांगता झाली.

## दखल

### पाऊस, धुके अन् थंडीत पोलिसांची अहोरात्र सेवा

**भीमाशंकर :** श्रावण महिन्यानिमित्त भीमाशंकर येथे भाविकांची मोठी गर्दी होत असून, मुसळधार पाऊस, दाट धुके आणि बोचऱ्या थंडीतही भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस आणि गृहरक्षक दलाचे जवान अहोरात्र कर्तव्य बजावत आहेत.

श्रावणी सोमवार तसेच सुट्टीच्या दिवशी भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन वाहनतळापासून मंदिर परिसरापर्यंत कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. घोडेगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून नियमन करत आहेत.



मंदिर परिसरातील दर्शन रांगेचे नियोजन, भाविकांना शिस्तबद्ध पद्धतीने दर्शनासाठी सोडणे, ज्येष्ठ नागरिक व महिलांना मदत करणे तसेच गर्दीत अनुचित प्रकार घडू नये, यासाठी खेड व घोडेगाव पोलिसांचे पथक तैनात आहे.

डोंगराळ परिसर, आव्हानात्मक रस्ते, दाट धुक्यामुळे कमी झालेली दृश्यमानता आणि सततचा पाऊस अशा प्रतिकूल परिस्थितीतही पोलिस कर्मचारी आपली सेवा बजावत आहेत. 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याप्रमाणे भाविकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे.

घोडेगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सागर पवार म्हणाले, पाऊस, थंडी किंवा धुक्याची तमा न बाळगता भाविकांचा प्रवास आणि दर्शन सुलभ व सुरक्षित व्हावे, हाच आमचा प्रयत्न आहे.या बंदोबस्तात पोलिस हवालदार रमेश काठे, पोलिस नाईक तेजस इष्टे, विठ्ठल वाघ, रवि सुरकुले, शिवाजी केंगले, आशुतोष पानसरे, पोलिस कॉन्स्टेबल दत्ता आहेर, राहुल मुसळे, शाईन इनामदार तसेच गृहरक्षक दलाचे जवान दिनेश तिटकारे, सखाराम केंगले, रविंद्र कोळप, प्रदिप मेचकर, हनुमंत भोपळे, युवराज केंगले, विलास इष्टे, आकाश केंगले, संदिप दांगट आदी सहभागी आहेत.

### लिक्विड नायट्रोजन शोमधून विद्यार्थ्यांना विज्ञानाची अनुभूती

**आळंदी :** श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये 'विज्ञान आपल्या दारी' उपक्रमांतर्गत एल.जी. मोबाइल सायन्स आणि पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने सायन्स डेमोन्स्ट्रेशन तसेच 'लिक्विड नायट्रोजन शो'चे आयोजन करण्यात आले. विविध वैज्ञानिक प्रयोगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विज्ञानातील संकल्पनांची प्रत्यक्ष अनुभूती देण्यात आली. लिक्विड नायट्रोजनच्या प्रयोगांनी विद्यार्थ्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले. यावेळी संस्थेचे सचिव अजित वडगावकर यांनी विद्यार्थ्यांनी विज्ञानाला आत्मज्ञानाची जोड देत वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहन केले. सायन्स पार्कचे समन्वयक सुनील पोटे यांनी विद्यालयातील विज्ञानविषयक उपक्रमांचे कौतुक केले.विज्ञान विभागाचे किरण तुरुकमारे, सचिन मोहिते, रवी मगर आणि नयन दास यांनी विविध प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर केले. कार्यक्रमास प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

### रुग्णालयासमोरील अतिक्रमण हटविताना नगरपरिषद पथकावर हल्ला

**आळंदी :** ग्रामीण रुग्णालयासमोरील सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यासाठी गेलेल्या आळंदी नगरपरिषदेच्या अतिक्रमणविरोधी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अतिक्रमणधारकांनी हल्ला करून मारहाण केल्याची घटना गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास घडली. या घटनेत एक अधिकारी आणि दहा कर्मचारी अशा ११ जणांना मारहाण झाल्याची माहिती नगरपरिषद



प्रशासनाने दिली. ग्रामीण रुग्णालयासमोरील सार्वजनिक रस्त्यावर काही विक्रेते अनधिकृतपणे व्यवसाय करीत असल्याने नागरिक, रुग्ण तसेच रुग्णवाहिकांच्या वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. याबाबत नगरपरिषदेकडून संबंधित विक्रेत्यांना यापूर्वी अनेकदा सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, सूचनांकडे दुर्लक्ष करून पुन्हा अतिक्रमण करण्यात आल्याने नगरपरिषदेचे पथक कारवाईसाठी गेले होते. कारवाईदरम्यान अतिक्रमणधारकांनी कर्मचाऱ्यांशी वाद घालत त्यांच्या अंगावर धावून जात मारहाण केली, असा आरोप नगरपरिषद प्रशासनाने केला आहे. मारहाणीनंतर पथकाने रस्त्यावर विक्रीसाठी ठेवलेले साहित्य जप्त केले असून, संबंधितांविरोधात पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, यापूर्वीही अतिक्रमणामुळे रुग्णवाहिकेला रस्ता न मिळाल्याने उपचारास विलंब होऊन एका रुग्णाचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना घडली होती. त्यामुळे रुग्णालयासमोरील सार्वजनिक रस्ता अतिक्रमणमुक्त ठेवणे आवश्यक असून, शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना संरक्षण मिळावे, अशी मागणी नगरपरिषद प्रशासनाने केली आहे.

## साखरेचे दर वाढले, मग उसाचा दर कमी का?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दौंड :** साखरेचे घाऊक व किरकोळ दर सातत्याने वाढत असताना कष्टाने पिकवलेल्या उसाला मात्र अपेक्षित दर का मिळत नाही, असा सवाल जय शिवसंग्राम संघटनेचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व दौंड तालुका अध्यक्ष संजय शिंदे यांनी उपस्थित केला आहे.

गेल्या दीड वर्षात साखरेचे दर ४५ रुपयांवरून ८० रुपये किलोपर्यंत वाढल्याचा दावा शिंदे यांनी केला. ऊसापासून साखरेबरोबरच इथेनॉल, स्पिरीट, वीज आदी उपपदार्थ तयार होतात. त्यांच्या दरातही वाढ होत असताना ऊस उत्पादकांना गेल्या तीन-चार वर्षांत त्या प्रमाणात वाढीव दर मिळालेला नाही, असे त्यांनी म्हटले आहे.साखर कारखान्यांनी गतहंगामातील किती साखर साठवून ठेवली आहे, सध्या किती दराने व किती प्रमाणात साखर विकली जात आहे, याची माहिती ऊस उत्पादक शेतकरी व सभासदांना द्यावी, अशी मागणी शिंदे यांनी केली. साखरेच्या वाढलेल्या दराचा फायदा ऊस उत्पादकांना मिळायला हवा, अशी भूमिका त्यांनी मांडली.उसाच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली असून, आगामी दसरा-दिवाळीपूर्वी गतहंगामातील एफआरपीपेक्षा किमान ७०० ते ९०० रुपये अधिक दर द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. हा दर देणे शक्य नसल्याचे कारखाना संचालकांचे म्हणणे असल्यास



**ऊसकरी शेतकऱ्यांनी संघटित होऊन साखर कारखाना किंवा गुऱ्हाळाकडे पाच हजार रुपये दराची मागणी करावी. हा दर मिळत नसेल तर उसाच्या तोडी बंद ठेवण्याची भूमिका घ्यावी. आपल्या कष्टाची योग्य किंमत मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आता संघटित होणे गरजेचे आहे.**
**– संजय शिंदे, पुणे जिल्हा उपाध्यक्ष व दौंड तालुका अध्यक्ष, जय शिवसंग्राम संघटना**

त्यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करून वाढीव साखरेच्या दरातून मिळणारा पैसा कुठे जातो, हे स्पष्ट करावे, असे आवाहन त्यांनी केले.

साखरेच्या दरवाढीचा लाभ ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळण्यासाठी मुख्यमंत्री आणि कृषिमंत्र्यांनी हस्तक्षेप करावा, अशी मागणीही शिंदे यांनी केली. दरम्यान, वाढीव ऊसदरासाठी गावागावांत चर्चा सुरू असून, मागणी मान्य न झाल्यास शेतकऱ्यांची तरुण पिढी आंदोलन उभारेल, असा इशाराही त्यांनी दिला.

## १७ वर्षीय मुलाने घेतला गळफास, आईचाही संशयास्पद मृत्यू..!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामती तालुक्यातील तांदुळवाडी येथील दादा पाटीलनगर परिसरात एकाच घरात आई व १७ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवार, २१ ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली. विवेक विजय गावडे (वय १७)( रा: दादा पाटील नगर तांदुळवाडी, मूळ राहणार करावागज बारामती ) याने घरातील पत्र्याच्या अँगलला सुती दोरीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे आढळून आले, तर त्याची आई रमा विजय गावडे (वय ४१) या घरातील खोलीत मृतावस्थेत आढळून आल्या. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजय रामदास गावडे हे जी.टी.एन. कंपनीमध्ये रात्रपाळीच्या ड्युटीवर गेले होते. शुक्रवार, २१ ऑगस्ट रोजी सकाळी ते घरी परतले असता घराचा दरवाजा बंद असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी पत्नी रमा व मुलगा विवेक यांना आवाज दिला; मात्र आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी शेजारी राहणारे सुरज भिमराव शिंदे यांना बोलावून घेतले. दोघांनी दरवाजा उघडून घरात प्रवेश केला असता आतील खोलीत विवेक हा पत्र्याच्या अँगलला आकाशी रंगाच्या सुती दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. त्याच खोलीतील भिंतीजवळील खिडकीजवळ रमा गावडे या पाठीवर झोपलेल्या अवस्थेत आढळून आल्या. रमा यांना आवाज देऊन तसेच हलवून उठविण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या शरीराची कोणतीही हालचाल होत नसल्याचे दिसून आले. त्यांच्या गळ्यावर काळसर व्रणही दिसून आल्याची माहिती पोलिसांत दाखल करण्यात आलेल्या खबरमध्ये नमूद आहे.

## शिरदाळेत हनुमान देवाचा भंडारा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** शिरदाळे (ता. आंबेगाव) येथे ग्रामदैवत हनुमान देवाचा भंडारा उत्सव भक्तिभावाने व उत्साहात पार पडला. उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी ७ वाजता ह. भ. प. तान्हाजी महाराज तांबे यांच्या हस्ते हनुमान देवाची नित्यपूजा करण्यात आली. सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत महाभिषेक व त्यानंतर महाआरती झाली.

सायंकाळी ७.३० वाजता ग्रामस्थांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. पुरी, गुळवणी, कांद्याची मिरची व हिरवी मिरची असा पारंपरिक बेत महाप्रसादासाठी ठेवण्यात आला होता. महाप्रसादाच्या तयारीत महिला व ज्येष्ठ नागरिकांनी योगदान दिले, तर तरुणांनी वाटपाचे नियोजन केले.

कार्यक्रमाची सांगता हनुमान प्रासादिक भजनी मंडळ, शिरदाळे यांच्या भक्तिमय भजनाने झाली. उत्सवाच्या दिवशी समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण होते. उत्सवातून ग्रामस्थांची एकजूट, धार्मिक परंपरा आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली.

## पीडित कुटुंबाला उपमुख्यमंत्र्यांचा फोन; कठोर शिक्षेसाठी पाठपुरावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार व मृत्यूच्या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर विधान परिषद सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पीडित कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीवरून कुटुंबीयांशी संवाद साधत शासन त्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही दिली.

डॉ. गोऱ्हे यांनी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल यांच्याकडून तपासाची माहिती घेतली. वैद्यकीय, फॉरेन्सिक व तांत्रिक पुरावे भक्कमपणे संकलित करून आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा मिळण्यासाठी प्रभावी न्यायालयीन पाठपुरावा करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

पीडित कुटुंबाने आरोपीला कठोर शिक्षा, अवैध मद्यविक्री व व्यसनाधीनतेवर नियंत्रण आणि सुरक्षित वातावरणाची मागणी केल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण व दुर्गम भागातील महिला आणि बालकांच्या सुरक्षेसाठी 'कम्युनिटी पोलिसिंग' मजबूत करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी पिंपळवंडी पोलीस ठाणे व स्थानिक सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करत 'पिंपळवंडी पॅटर्न ऑफ पोलीस सिक्युरिटी' विकसित करण्याची गरज डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केली.

महिला सुरक्षेची जबाबदारी केवळ मुलींवर न टाकता मुलगे व युवकांमध्ये महिलांचा सन्मान, संमती आणि कायद्याची जाणीव याबाबत प्रबोधन करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. पीडित कुटुंबाची ओळख व गोपनीयता जपण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

## आई-वडिलांच्या रागावल्याने घरातून निघालेल्या मुलीचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** आई-वडिलांनी रागावल्याने घरातून निघून गेलेल्या अल्पवयीन मुलीचा रुई येथील स्वामी समर्थ रेसिडेन्सी इमारतीजवळ मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. प्राथमिक तपासात मुलीने इमारतीच्या पाचव्या मजल्यावरील टेरेसवरून उडी मारल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असले, तरी मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे दहा वाजता आई-वडिलांनी मुलीला रागावले. त्यानंतर ती घरातून निघून गेली. कुटुंबीयांनी शोध घेतल्यानंतरही ती न सापडल्याने २३ ऑगस्ट रोजी पहाटे बारामती तालुका पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४०१/२०२६, कलम १३७(२) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान, रुई येथील स्वामी समर्थ रेसिडेन्सीच्या बाजूला मुलगी मृतावस्थेत आढळल्याची माहिती डायल ११२ चे पोलीस हेड कॉन्स्टेबल कृष्णा कांबळे यांना मिळाली. घटनास्थळी जाऊन नातेवाईकांकडून ओळख पटविल्यानंतर तीच हरवलेली अल्पवयीन मुलगी असल्याचे स्पष्ट झाले.घटनेची माहिती मिळताच महिला पोलीस उपनिरीक्षक धनश्री भगत, उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम आणि पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी घटनास्थळी पाहणी केली. फॉरेन्सिक टीम तसेच डिटेक्शन ब्रांचच्या तीन पथकांनीही घटनास्थळी तपास केला.

पाचव्या मजल्यावरील टेरेसचा दरवाजा बाहेरून बंद असल्याचे आढळले. शिडीच्या सहाय्याने टेरेसवर प्रवेश केल्यानंतर तेथे मुलीची चप्पल सापडली. तसेच लिफ्टजवळील सीसीटीव्ही फुटेजमध्ये मुलगी रात्री ९.५८ वाजता लिफ्टने वर जाताना दिसून आली.

मुलीच्या शरीरावर खरचटल्याच्या जखमा असून डावा हात व डावा पाय फ्रॅक्चर झाल्याचे प्राथमिक तपासात आढळले. घटनास्थळावरील परिस्थिती, सीसीटीव्ही फुटेज आणि परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे मुलीने उडी मारल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. मात्र मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

मृतदेह शवविच्छेदनासाठी वैद्यकीय महाविद्यालय, बारामती येथे पाठविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम आणि पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक धनश्री भगत करीत आहेत.

# चाकणमधील वीजपुरवठा सक्षम करण्यासाठी महावितरणकडून तातडीच्या उपाययोजना

### महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर 'ऑन फिल्ड'; १० एमव्हीए क्षमतेची दोन रोहित्रे कार्यान्वित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** चाकण औद्योगिक क्षेत्रातील ग्राहकांना अखंडित व विश्वासार्ह वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणने वीज यंत्रणा सक्षम करण्याच्या उपाययोजनांना गती दिली आहे. महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी शनिवारी (दि. २२) चाकण एमआयडीसी परिसरातील वीजपुरवठा यंत्रणेची प्रत्यक्ष पाहणी करुन आढावा घेतला. तसेच ३३/२२ केव्ही भांबोली आणि ह्युंदाई उपकेंद्रांमध्ये प्रत्येकी १० एमव्हीए क्षमतेची रोहित्रे कार्यान्वित केली. या अतिरिक्त रोहित्रांमुळे चाकण औद्योगिक क्षेत्रातील वीजपुरवठा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

ह्युंदाई येथील केंद्र यापूर्वी केवळ स्विचिंग स्टेशन म्हणून कार्यरत होते.



चाकण येथील महावितरणच्या उपकेंद्रात उच्चदाब रोहित्र कार्यान्वित करताना संचालक (संचालन) धनंजय औंढेकर व इतर वरिष्ठ अधिकारी.

वाढत्या औद्योगिक वीजभाराचा विचार करून त्याचे ३३/२२ केव्ही उपकेंद्रात रूपांतर करण्यासाठी मुख्य अभियंत्यांनी पाठपुरावा केला. त्यास संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी तातडीने मंजुरी दिली. त्यानुसार ह्युंदाई येथील केंद्राचे ३३/२२ केव्ही उपकेंद्रात रूपांतर करून ते कार्यान्वित करण्यात आले. त्याचबरोबर ३३/२२ केव्ही भांबोली उपकेंद्रात अतिरिक्त १० एमव्हीए क्षमतेचे रोहित्र कार्यान्वित करण्यात आले आहे.चाकण औद्योगिक क्षेत्राचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि भविष्यातील वाढती विजेची मागणी लक्षात घेऊन महावितरण व महापारेषणच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने कामे गतीने पूर्ण करावीत. भविष्यातील वीज मागणीचे अचूक नियोजन करून औद्योगिक ग्राहकांना विश्वासार्ह व दर्जेदार वीजपुरवठा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना वेळेत पूर्ण कराव्यात, असे निर्देश धनंजय औंढेकर यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले. यावेळी महावितरण व महापारेषणचे वरिष्ठ अभियंते उपस्थित होते.

**महापारेषणच्या अतिउच्चदाब यंत्रणेचीही पाहणी:**

महावितरणचे संचालक धनंजय औंढेकर यांनी महापारेषण कंपनीच्या ४०० केव्ही चाकण, २२० केव्ही ब्रिजस्टोन आणि २२० केव्ही चाकण फेज-२ या अतिउच्चदाब उपकेंद्रांचीही पाहणी करून आगामी काळातील वीजपुरवठा नियोजनाचा आढावा घेतला.

२२० केव्ही ब्रिजस्टोन उपकेंद्रात ५० एमव्हीए क्षमतेचे रोहित्र नुकतेच कार्यान्वित करण्यात आले आहे.

तसेच, ४०० केव्ही चाकण उपकेंद्रात २२ केव्हीचे चार अतिरिक्त 'फिडर बे' उभारण्याचे काम सुरू असल्याची माहिती महापारेषणच्या अभियंत्यांनी दिली. तर २२० केव्ही चाकण फेज-२ उपकेंद्रात अतिरिक्त १०० एमव्हीए क्षमतेचे रोहित्र बसविण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. या उपाययोजनांमुळे चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या वीज मागणीची पूर्तता करण्यासाठी महावितरण व महापारेषणची यंत्रणा अधिक सक्षम होणार आहे.

द·ख·ल

## तहसीलदार वांढेकर यांचा सत्कार



**तिसगाव :** अहिल्यानगर जिल्ह्याचे सुपुत्र अभिजीत वांढेकर यांची नुकतीच तहसीलदारपदी नियुक्ती झाली आहे. एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील असलेले अभिजीत वांढेकर नायब तहसीलदार म्हणून अहिल्यानगर येथे कार्यरत होते. महसूल विभागाने राज्यातील काही प्रमुख प्रशासकीय अधिकाऱ्यांना बढती दिली असून त्यामध्ये अभिजीत वांढेकर यांची नायब तहसीलदार पदावरून तहसीलदार पदावर नियुक्ती झाली आहे . अभिजीत वांढेकर यांची तहसीलदारपदी निवड झाल्याने त्यांचा  नगरसेवक महेश तवले,ऊद्योजक अनिकेत चेमटे चेअरमन बंडू पाठक यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला आहे.

## वासुंदे येथे अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजन संपन्न



**टाकळी ढोकेश्वर :** वासुंदे येथील पारखे वस्ती ते तोरेवस्ती रस्ता मजबुतीकरण या महत्त्वपूर्ण विकासकामाचे भूमिपूजन जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या रस्त्याच्या मजबुतीकरणामुळे पारखे वस्ती, तोरेवस्ती तसेच परिसरातील ग्रामस्थांची वाहतूक अधिक सुलभ होण्यास मदत होणार असून, दळणवळणाच्या दृष्टीने या कामाला विशेष महत्त्व आहे.यावेळी उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी रस्त्याचे काम मंजूर करून प्रत्यक्षात सुरू केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. परिसराच्या विकासासाठी आवश्यक असलेली विविध कामे सातत्याने मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी विमल झावरे, बाळासाहेब शिंदे, भाऊसाहेब सैद, शंकर बर्वे, दिलीप पाटोळे, बाळासाहेब झावरे,नारायण झावरे, लहानभाऊ झावरे, भास्कर लोंढे तसेच पारखे वस्ती, तोरेवस्ती व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## बीजगोळ्यांतून विद्यार्थ्यांचा पर्यावरण संवर्धनाचा संकल्प



**पाथर्डी शहर :** संत वामनभाऊ तरुण मंडळाच्या वतीने माझी वसुंधरा अभियान टप्पा क्रमांक दोन अंतर्गत श्री तिलोक जैन विद्यालयात बीज संकलन व बीजगोळे निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली. विद्यालयातील इको-क्लबच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मंडळाचे अध्यक्ष तथा शिवव्याख्याते सचिन नागापुरे यांनी प्रास्ताविकातून मंडळाच्या ३७ वर्षांच्या सामाजिक व पर्यावरणपूरक कार्याची माहिती दिली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक करून पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना सहशिक्षक डॉ. उद्धव घोशिर व चंद्रकांत उदागे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ओंकार गायकवाड यांनी, तर आभार प्रदर्शन बंटी जेधे यांनी केले. कार्यक्रमासाठी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. छायाचित्रण सुनील शेवाळे यांनी केले.

## नक्षत्र लॉनजवळ गांजा ओढणाऱ्या तरुणावर पोलिसांची कारवाई

**अहिल्यानगर :** शहरातील बुरुडगाव रस्त्यावरील नक्षत्र लॉनशेजारील मोकळ्या जागेत चिलीमच्या साहाय्याने गांजा ओढणाऱ्या एका तरुणावर कोतवाली पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार गुन्हा नोंदवला आहे. ऋषिकेश देविदास आनंदकर (रा. श्रीरामनगर, बुरुडगाव रस्ता, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार सुरज दिलीप कदम यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २१ ऑगस्ट रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास आरोपी ऋषिकेश आनंदकर हा बुरुडगाव रस्त्यावरील नक्षत्र लॉनच्या शेजारी असलेल्या मोकळ्या मैदानात संशयास्पदरीत्या बसला होता. पोलीस पथक गस्तीवर असताना तो काळ्या रंगाच्या मातीच्या चिलीममधून गांजाचे सेवन करताना रंगेहात मिळून आला. पोलिसांनी घटनास्थळावरून गांजा ओढण्यासाठी वापरण्यात येणारी मातीची चिलीम, मळकट कापडाचा तुकडा आणि काडीपेटी जप्त केली. पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेऊन अहिल्यानगरच्या जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आरोपीने गांजाचे सेवन केल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्राद्वारे स्पष्ट केले. या प्रकरणी पोलीस हवालदार सुरज कदम यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बोल्हेगावात घरात घुसून विवाहितेचा विनयभंग

**अहिल्यानगर :** शहरातील बोल्हेगाव परिसरातील गांधीनगर येथे भरदिवसा घरात घुसून एका २५ वर्षीय विवाहितेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपी समीर अखिल शेख याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बोल्हेगाव येथील भीम चौकात पीडित महिला ही शुक्रवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास आपल्या घरात नेहमीप्रमाणे काम करत होती. त्यावेळी त्याच परिसरात राहणारा आरोपी समीर अखिल शेख हा तिच्या घरात शिरला. त्याने महिलेकडे मला तुला भेटायचे आहे, तुझा मोबाईल नंबर दे, अशी मागणी केली. महिलेला काही समजण्याच्या आतच आरोपीने तिच्या गळ्यात हात टाकून मिठी मारली तसेच अंगाला अयोग्य स्पर्श करून लज्जास्पद कृत्य केले. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने विरोध करताच आरोपी तिथून पसार झाला. यानंतर पीडित महिलेने तोफखाना पोलीस ठाण्यात जाऊन घडलेल्या प्रकाराबाबत तक्रार दिली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी समीर शेख याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७४ अन्वये विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

# रामगिरी बाबा टेकडीच्या कामाची तज्ज्ञ समितीकडून तपासणी

### जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांची प्रत्यक्ष पाहणी; तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेतले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी शहर :** शहरातील रामगिरी बाबा टेकडी येथील सुशोभीकरण व उद्यानाच्या कामाबाबत उपस्थित झालेल्या तक्रारींची दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शनिवारी सकाळी टेकडीची प्रत्यक्ष पाहणी केली. कामाच्या अनुषंगाने उपस्थित करण्यात आलेल्या तांत्रिक व सुरक्षिततेच्या प्रश्नांची वस्तुस्थिती तपासण्यासाठी तज्ज्ञ समिती नेमण्यात येणार असून, समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, तज्ज्ञ समितीचा अहवाल येईपर्यंत सुरू असलेले विकासकाम बंद करण्यात येणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.

रामगिरी बाबा टेकडीच्या सुशोभीकरण व उद्यानाच्या कामासाठी करण्यात आलेल्या खोदकामावरून मागील काही दिवसांपासून शहरात चर्चा सुरू आहे. टेकडीवरील खोदकामामुळे भविष्यात सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, टेकडीवर असलेल्या शहराच्या पाणीपुरवठ्याच्या टाक्यांच्या सुरक्षेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. माजी नगरसेवक डॉ. दीपक देशमुख व सामाजिक कार्यकर्ते अरविंद सोनटक्के यांनी याबाबत प्रशासनाकडे तक्रार केली होती.



तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शनिवारी सकाळी रामगिरी बाबा टेकडीवर जाऊन सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. पाहणीनंतर तहसील कार्यालयात तक्रारदारांचे म्हणणे सविस्तर ऐकून घेण्यात आले.

टेकडीवर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सुमारे १० लाख व १९ लाख लिटर क्षमतेच्या दोन पाण्याच्या टाक्या असल्याचे तक्रारदारांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. टेकडीच्या मोठ्या भागात खोदकाम झाल्याने अतिवृष्टीच्या काळात माती खचणे किंवा दरड कोसळण्यासारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे का, तसेच या कामाचा पाणी साठवण टाक्यांच्या सुरक्षिततेवर काही परिणाम होतो का, याची तांत्रिक तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

या सर्व बाबींची वस्तुनिष्ठ तपासणी करण्यासाठी तज्ज्ञ समितीमार्फत टेकडीवरील कामाचे स्वरूप, खोदकाम, परिसराची सुरक्षितता, पाणी साठवण टाक्यांची स्थिती आणि संबंधित तांत्रिक बाबींचा अभ्यास करण्यात येणार आहे. केवळ तक्रारीच्या आधारे घाईने कोणताही निष्कर्ष न काढता तज्ज्ञांचा अहवाल घेऊन त्यानंतर निर्णय घेण्याची भूमिका जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी घेतली आहे. त्यामुळे तक्रारींची दखल घेतानाच सुरू असलेल्या विकासकामांना विनाकारण अडथळा येणार नाही, याचीही प्रशासनाने दक्षता घेतली आहे.

बैठकीदरम्यान पाथर्डी शहरातील विविध रस्त्यांवरील स्पीड ब्रेकरचा मुद्दाही चर्चेत आला. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने स्पीड ब्रेकर आवश्यक असले तरी ते तांत्रिक निकषांनुसारच उभारले जाणे गरजेचे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. स्पीड ब्रेकरसाठी जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची मान्यता, संबंधित विभागाचा तांत्रिक अभिप्राय तसेच पोलिस विभागाचे मत आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. तसेच इंडियन रोड काँग्रेसच्या निकषांनुसार स्पीड ब्रेकरवर रिफ्लेक्टर बसविणे आणि वाहनचालकांना तो पुरेशा अंतरावरून स्पष्टपणे दिसेल, याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. शहरातील विकासकामे करताना शासनाच्या नियमांचे, तांत्रिक निकषांचे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित मानकांचे पालन होणे आवश्यक आहे. कोणत्याही कामात नियमांचे उल्लंघन अथवा तांत्रिक त्रुटी आढळल्यास त्याची तपासणी करून नियमानुसार कार्यवाही केली जाईल, अशी प्रशासनाची भूमिका आहे.

रामगिरी बाबा टेकडीच्या प्रकरणात तज्ज्ञ समितीचा अहवाल आता निर्णायक ठरणार असून, अहवालातील निष्कर्षांच्या आधारे पुढील निर्णय घेतला जाणार आहे. तक्रारींची दखल घेणे, प्रत्यक्ष पाहणी करणे, संबंधितांचे म्हणणे ऐकून घेणे आणि तांत्रिक अहवालाच्या आधारे निर्णय घेणे, या प्रक्रियेमुळे प्रशासनाने विकास आणि सुरक्षितता यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. आता तज्ज्ञ समितीच्या अहवालाकडे पाथर्डीकरांचे लक्ष लागले आहे.

## दुर्गंधीयुक्त पाणी पिण्याची औरंगपुरकरांवर वेळ!

### सार्वजनिक नळपाणी योजनेचा व्हॉल्व वर्षभरापासून नादुरुस्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** पाथर्डी तालुक्यातील औरंगपुर येथे सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित असतानाही ग्रामस्थांना मात्र दुर्गंधीयुक्त व अस्वच्छ पाणी पिण्याची वेळ आली आहे. गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी बसविण्यात आलेला महत्त्वाचा व्हॉल्व गेल्या वर्षभरापासून नादुरुस्त असून, त्यातून होणाऱ्या गळतीमुळे परिसरात पाणी साचले आहे. या साचलेल्या पाण्यात डासांची पैदास होत असून, व्हॉल्वभोवती मोठ्या प्रमाणात गवत व झाडाझुडपे वाढली आहेत. त्यामुळे पाणी दूषित होण्याची शक्यता निर्माण झाली असून, नागरिकांच्या



आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

**गळतीचे पाणी पुन्हा नळातून?**

व्हॉल्वला लिकेज असल्याने त्याठिकाणी साचलेले पाणी आणि अस्वच्छ परिसराचा परिणाम पाणीपुरवठ्यावर होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर हेच पाणी नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. साचलेल्या पाण्यावर डासांची अंडी व डासांची पैदास होत असल्याचे चित्रही दिसून येत आहे. त्यामुळे साथीचे आजार पसरण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

**ग्रामस्थांच्या तक्रारीकडे दुर्लक्षाचा आरोप**

या गंभीर प्रकाराची माहिती गणेश काकडे व अमोल देशमुख यांनी ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच व उपसरपंच यांना वेळोवेळी दिल्याचे सांगण्यात येते. व्हॉल्व दुरुस्त करून परिसर स्वच्छ करण्याची मागणी करूनही अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वर्षभरापासून नादुरुस्त असलेला व्हॉल्व दुरुस्त करण्यासाठी नेमकी कोणाची परवानगी किंवा कोणत्या अडचणी आहेत, असा सवालही उपस्थित होत आहे.

**फिल्टर असूनही उपयोग काय?**

गावातील नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे म्हणून फिल्टरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र हा फिल्टरही गेल्या महिनाभरापासून बंद असल्याने तो असून नसल्यासारखाच झाला आहे. परिणामी ग्रामस्थ, महिला, लहान मुले, शाळकरी विद्यार्थी तसेच अंगणवाडीतील बालकांनाही त्याच पाणीपुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत आहे.

## विद्यार्थांनी अभ्यासातुन जीवन सार्थक करावे : म्हस्के महाराज



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** आजच्या आधुनिक युगात जीवनामध्ये शिक्षणाचे खूप अनन्य साधारण महत्त्व असून त्याचबरोबर परमार्थ हा देखील महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांच्या कष्टाचा विचार करून व त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून चांगला अभ्यास करून आपल्या जीवनाचे सार्थक करावे व नको त्या गोष्टींमध्ये लक्ष घालू नये असे प्रतिपादन ज्ञानेश्वर संस्थानचे अध्यक्ष हभप देविदास महाराज म्हस्के यांनी बोलताना व्यक्त केले.

यावेळी संतोष शेटे, दिलीप राजळे, माजी सरपंच अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब राजळे, ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र काकडे, रामाप्पा गिरम, उपसरपंच राजू खंडागळे, दारकुंडे सर, प्रशांत वेलदे ,प्रदीप मडके, प्रदीप गवळी, सुयोग बनकर, विजय कावले, डॉ महेश भालेराव, शिवाजी मडके, आसाराम शिंदे,शिक्षक दिपक बोडखे शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## दोन उपकेंद्रे दोन दिवसांपासून बंद

### श्रीगोंदा तालुक्यात गावागावांत अंधार, पाणीप्रश्न पेटला!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील टाकळी कडेवळीत आणि तांदळी दुमाला येथील विद्युत उपकेंद्रे गेल्या दोन दिवसांपासून बंद असल्याने या उपकेंद्रांच्या अंतर्गत येणाऱ्या अनेक गावांतील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने पिण्याचे पाणी, शेती, व्यवसाय, लघुउद्योग यांसह अनेक प्रश्न निर्माण झाले असून नागरिकांचा संताप आता उफाळून आला आहे. बिघाड नेमका कुठे झाला आहे, हे शोधण्यात महावितरणच्या अधिकाऱ्यांना अद्याप यश आले नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, टाकळी कडेवळीत विद्युत उपकेंद्राच्या अंतर्गत टाकळी कडेवळीत, चांडगाव, शेडगाव, हिरडगाव आणि घोडेगाव आदी गावांतील वीजपुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. तर तांदळी दुमाला विद्युत उपकेंद्राच्या अंतर्गत तांदळी दुमाला, टाकळी लोणार, कोसेगव्हण, भावडी, कोकनगाव, आढळगाव, देऊळगाव आणि पिसोरेखांडआदी गावांमध्येही गेल्या दोन दिवसांपासून अंधाराचे साम्राज्य आहे.

वीजपुरवठा बंद असल्याने अनेक गावांतील पाणीपुरवठा योजना ठप्प झाल्या आहेत. पाण्याच्या मोटारी सुरू होत नसल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पाण्यासाठी मोठी धावपळ करावी लागत आहे. वीजपुरवठा पूर्ववत कधी होणार, याबाबत महावितरणकडून स्पष्ट माहिती मिळत नसल्याने नागरिकांचा संताप आणखी वाढत आहे. दोन दिवस उलटूनही बिघाडाचा नेमका शोध लागत नसल्याने महावितरणच्या कारभारावर नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## विद्यार्थ्यांनो व्यसनमुक्तीचे ब्रँड म्बेसिडर व्हा : प्रा.नरवडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शहरटाकळी :** प्रजापिता ईश्वरीय विश्वविद्यालय ही सामाजिक संस्था व्यसनमुक्ती, ताणतणाव नियंत्रण करण्याचे काम करते. या संस्थेने १० कोटी नशामुक्त अभियानाचे उद्दिष्ट ठेवले आहे. जगातील ११० हून अधिक देशांमध्ये ही संस्था काम करते. नशामुक्तीच्या या अभियानामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन ब्रँड अँबेसिडर ची भूमिका पार पाडावी असे प्रतिपादन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे प्रा. अशोक नरवडे यांनी केले.ते आज कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित कार्यक्रम



प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. व्यासपीठावर प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयाच्या संचालिका पुष्पा, प्रा.नरवडे मॅडम, जयश्री कातकडे विद्यालयाच्या प्रा. अंजली चिंतामण, पोपट खताळ, विद्यालयातील सर्व शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कर्मयोगी आबासाहेब काकडे, स्व.निर्मला काकडे, विद्येची देवता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सहशिक्षक दिपक बोडखे यांनी नशामुक्तीचे महत्त्व विशद केले. यावेळी प्रमुख अतिथी पुष्पादीदी बोलताना म्हणाल्या की, नशेमुळे बुद्धी, धन यांचा नाश होतो. यावेळी पुष्पा यांनी विद्यालयाच्या ग्रंथालयास पुस्तक भेट दिले. यावेळी सर्व विद्यार्थी शिक्षक बंधू भगिनींनी नशामुक्तीची प्रतिज्ञा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास पांढरे यांनी, अनुमोदन गणेश लबडे यांनी तर आभार आशा कानडे यांनी मानले.

# श्रावणात काशी विश्वनाथ मंदिरात भक्तीचा जागर

### प्रत्येक सोमवारी काशी विश्वनाथाच्या चरणी भाविकांची गर्दी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील काशी विश्वनाथ देवस्थान प्रसिद्ध आहे. देशात वाराणसीनंतर काशी विश्वनाथाचे दुसरे स्थान महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात श्रीगोंदा येथे आहे. येथील ढोरजे या गावी निसर्गाच्या सानिध्यात असलेले हे स्थान महादेव व त्याचा लाडका भक्त काशिनाथ यांच्या निस्सीम भक्तीची प्रचिती देते. भक्तासाठी देव काशीहून थेट ढोरजा गावी आले, त्यामुळे या स्थानाला 'प्रति काशीविश्वनाथ मंदिर' असेही म्हटले जाते. येथील दर्शनाने वाराणसीमधील काशी विश्वनाथाच्या दर्शनाचे पुण्य लाभते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. मंदिराची आख्यायिका अशी की श्रीगोंदा येथील ढोरजे पासून जवळच असलेल्या सुरोडी गावात महादेवाचे भक्त काशिनाथ राहत होते. प्रत्येक वर्षी श्रावणात वाराणसी येथे काशी विश्वनाथाच्या दर्शनासाठी ते गावातून पायी जात असत. त्यांचा हा क्रम अनेक वर्षे सुरू होता. काशिनाथांची निस्सीम भक्ती पाहून महादेव प्रसन्न झाले व त्यांनी वर मागण्यास सांगितले. त्यावर काशिनाथांनी सांगितले, 'देवा मला तुझ्या भक्तीत रममाण व्हायचे आहे. प्रत्येक वर्षी मी तुझ्या दर्शनाला येतो, आता तू माझ्याबरोबर माझ्या गावात चल, जेणेकरून मला दररोज तुझे दर्शन घेता येईल.' देवाने त्वरित होकार दिला व काशिनाथांसोबत त्यांच्या मागे जाऊ लागले. वाटेत मागे वळून पाहायचे नाही, अशी महादेवांची अट होती. त्यानुसार ते काशी येथून निघाले. मजल-दरमजल करीत ढोरजे गावात आल्यावर तेथील निसर्गरम्य परिसर महादेवांना भावला व ते काही क्षण तेथे थांबले. महादेव का थांबले, यासाठी काशिनाथांनी मागे वळून पाहिले असता महादेव जेथे उभे होते तेथून ते गुप्त झाले



व तेथे स्वयंभू शिवलिंग प्रगट झाले. त्यामुळे काशिनाथ तेथेच राहून शिवलिंगाची सेवा करू लागले. काही काळानंतर या ठिकाणी महादेवाचे विश्वनाथ मंदिर आणि भक्ताचे काशिनाथ मंदिर अशी दोन मंदिरे उभारण्यात आली. कालांतराने काशिनाथ-विश्वनाथांची मंदिरे काशी विश्वनाथ म्हणून प्रसिद्ध झाली.

यादवकालीन स्थापत्य रचना असलेली काशिनाथ आणि विश्वनाथ ही मंदिरे १२व्या ते १४व्या शतकातील आहेत. या मंदिरांबाबत असे सांगितले जाते की महादेव आणि काशिनाथ काशीवरून पश्चिम दिशेला चालत असताना काशिनाथांनी मागे वळून पूर्वेकडे असलेल्या महादेवांकडे पाहिले, त्यामुळे काशिनाथ मंदिर हे पूर्वाभिमुख, तर विश्वनाथ मंदिर हे पश्चिमाभिमुख आहे. या मंदिर परिसरात असलेल्या एका कातळावर अगस्ती ऋषींनी काही काळ तपश्चर्या केली होती.या दोन मंदिरांपैकी विश्वनाथ मंदिरावरील भिंतीवर अनेक शिल्पे कोरलेली आहेत. नंदीमंडप, सभामंडप व गर्भगृह अशी मंदिराची रचना आहे. नंदीमंडपातील नंदीशिवाय येथील सभामंडपातही नंदी आहे. सभामंडपाच्या भिंतींमध्ये अनेक विरगळ (युद्धामध्ये शहीद वा वीरगती प्राप्त झालेल्या वीरांचे स्मरण करण्यासाठी दगडावर केलेले कोरीव काम) आहेत. महाराष्ट्रात साधारणतः या वीरगळ प्राचीन मंदिराच्या दर्शनी भागात ठेवलेल्या आढळतात. सभामंडपातून गर्भगृहात जाताना तेथील प्रवेशद्वारावर अनेक कोरीव शिल्पे, तर ललाट बिंबावर गणेशाची मूर्ती आहे. गर्भगृहात काळ्या दगडातील शिवपिंडी आहे.विश्वनाथ मंदिराच्या समोर काशिनाथ मंदिर आहे. विश्वनाथांचे दर्शन घेण्याआधी या मंदिरात दर्शन घेण्याची पद्धत आहे. या मंदिराचा सभामंडप विश्वनाथ मंदिराच्या तुलनेने प्रशस्त आहे.

**निसर्गाच्या सान्निध्यात अध्यात्मिक अनुभव**

पावसाळ्यात हिरवाईने नटलेला मंदिर परिसर आणि त्यात सुरू असलेला शिवनामाचा गजर यामुळे भाविकांना अध्यात्मिक समाधानासोबतच निसर्गसौंदर्याचा अनुभव मिळत आहे. डोंगररांगा, हिरवाई आणि प्रसन्न वातावरणात काशी विश्वनाथाचे दर्शन घेण्याचा अनुभव भक्तांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.श्रावणातील सोमवारी मंदिरात होणारी गर्दी पाहता काशी विश्वनाथ मंदिर हे परिसरातील प्रमुख श्रद्धास्थान म्हणून पुन्हा एकदा अधोरेखित होत आहे. भक्ती, श्रद्धा आणि निसर्गाचा सुरेख संगम साधणाऱ्या या मंदिर परिसरात श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवार जणू भक्तीचा उत्सवच ठरत आहे.'हर हर महादेव'च्या जयघोषात काशी विश्वनाथाच्या चरणी नतमस्तक होणाऱ्या भाविकांमुळे मंदिर परिसर सध्या शिवमय झाला आहे.

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.२४ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८


# प्रेम अविच्छिन्न असते; भक्तीत अंतःकरणातील विशुद्ध प्रेम आवश्यक : महंत रामगिरी महाराज

## २ लाख ७५ हजार भाविकांची व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : भगवंताची भक्ती ही केवळ दिखावा नसून अंतःकरणातून उमटलेली विशुद्ध प्रेमभावना असली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत नष्ट न होणारे, अविच्छिन्न प्रेम हेच खरे प्रेम आहे. भक्तीमध्ये परमात्म्याप्रती तळमळ आणि अनन्य भाव आवश्यक आहे, असे प्रतिपादन महंत रामगिरीजी महाराज यांनी केले.

पुणतांबा येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात गीतेच्या बाराव्या अध्यायातील सहाव्या श्लोकावर विवेचन करताना ते बोलत होते.

प्रेमाचे स्वरूप स्पष्ट करताना त्यांनी नारद भक्तिसूत्राचा संदर्भ देत खरे प्रेम गुणरहित, कामनारहित, प्रतिक्षण वाढणारे, सूक्ष्म आणि अविच्छिन्न असते, असे सांगितले. मानवी नात्यांमध्ये परिस्थितीनुसार दुरावा निर्माण होतो; मात्र परिस्थिती बदलली तरी जे प्रेम कायम राहते तेच खरे प्रेम होय. श्रीकृष्ण-गोपींच्या प्रेमाचे उदाहरण देताना भक्तीमध्ये परमात्म्याच्या दर्शनाची उत्कट तळमळ असावी, असे त्यांनी सांगितले. सैनिक देशप्रेमासाठी मृत्यूची पर्वा न करता सीमेवर कर्तव्य बजावतात, याचा दाखला देत प्रेमाची ताकद त्यांनी स्पष्ट केली.

अखंड हरिनाम सप्ताह हा केवळ प्रसाद घेण्याचा कार्यक्रम नसून अध्यात्मरूपी अमृत ग्रहण करण्याची संधी आहे. भाविकांनी येथे येऊन जीवनातील दोष दूर करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अनेक भाविकांनी बीडी, गुटखा, तंबाखू व सिगारेट यांसारख्या व्यसनाच्या वस्तूंचा त्याग केला. यावेळी २ लाख ७५ हजार भाविकांनी व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ घेतली. या उपक्रमाचे विश्वविक्रमाचे प्रमाणपत्र महंत रामगिरीजी महाराज यांना सुपूर्द करण्यात आले.

व्यसनाबरोबरच जीवनातील दोषांचाही त्याग करण्याचा संकल्प प्रत्येकाने करावा, असे आवाहन त्यांनी केले.

### व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ

तरुण पिढी वाढत्या व्यसनाधीनतेकडे जात असल्याबद्दल चिंता व्यक्त करताना महंत रामगिरीजी महाराज यांनी कोणतेही व्यसन जीवनाला बरबाद करणारे असल्याचे सांगितले. एका बाजूला व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न करायचे आणि दुसऱ्या बाजूला मद्यविक्री व मद्यपानासाठी परवाने द्यायचे, या दोन्ही गोष्टी एकाच वेळी यशस्वी होणे कठीण असल्याची टीकाही त्यांनी केली.

# धीरज परदेशी हत्या प्रकरणातील मुख्य आरोपीचा मोबाईल पोलिसांच्या हाती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : मुकुंदनगर परिसरात झालेल्या धीरज परदेशी खून प्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या मुस्तकीम ख्वाजामिया सय्यद याचा मोबाईल पोलिसांच्या हाती लागला असून आहे. या मोबाईल मुळे धीरज परदेशी यांच्या हत्येतील गुढ उकलण्यास मदत होणार असल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून हाती आली आहे.

**गुढ उकलणार !**

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, मुकुंदनगर येथे महापालिकेचा कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी याचा निर्गुण खून करण्यात आला होता. या घटनेने अहिल्यानगर शहरात एकच खळबळ उडाली होती. शहरासह जिल्ह्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आत्तापर्यंत अकरा आरोपींना अटक करण्यात आली आहे. धीरज परदेशी याच्या खून प्रकरणातील महत्त्वाचा आरोपी असलेला मुस्ताकीम ख्वाजामिया सय्यद हा गुन्हा घडल्यानंतर त्याचा मोबाईल बुऱ्हानगर जवळील एका विहिरीत फेकून दिला होता. दरम्यान भिंगार कॅम्प पोलीस पथकाने आरोपीने विहिरीत फेकून दिलेला मोबाईल बाहेर काढण्यात यश मिळवले आहे. गेल्या तीन दिवसापासून पोलीस व पाणबुड्यांकडून मोबाईलच्या शोध सुरू होता. प्रशासनाने विहिरीतील पाणी उपसून मोबाईल शोधून काढला असून या मोबाईल मधून खुनाशी संबंधित महत्त्वाची माहिती मिळणार असल्याचे पोलीस सूत्रांकडून समजते.

मुख्य आरोपी मुस्ताकीम याच्या मोबाईलचा पोलीस शोध घेत होते. भिंगार कॅम्प पोलिसांनी सय्यद याने मोबाईल फेकलेल्या विहिरीचा शोध घेतला. मात्र विहिरीत पाणी असल्याने मोबाईल मिळून आला नाही. त्यामुळे पोलिसांनी नाशिक येथून पाचारण केलेल्या पाणबुड्यांच्या साह्याने तीन दिवसापासून विहिरीत मोबाईलचा शोध सुरू केला होता. अखेरीस या आरोपीचा मोबाईल पोलिसांच्या हाती लागल्याने आता धीरज परदेशी याच्या खुनातील महत्त्वाची माहिती पोलिसांच्या हाती मिळणार आहे.

धीरज परदेशी याच्या खून प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणात आतापर्यंत ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या आरोपींचे मोबाईल पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. मोबाईल मधून या खून प्रकरणातील महत्त्वाची माहिती मिळणार आहे.

# चाकणच्या खड्ड्यांवर आधुनिक तंत्रज्ञानाचा उतारा

**कंपन्यांच्या स्थलांतराच्या इशाऱ्यानंतर सरकारची तातडीची पावले**



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : चाकण औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे उद्योगांनी स्थलांतराचा इशारा दिल्यानंतर राज्य सरकारने तातडीने दखल घेत रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानंतर विशेष पथक चाकणमध्ये दाखल झाले असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने खड्डे बुजविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कामाची पाहणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चाकणला भेट दिली. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत उपस्थित होते. पावसाळ्यात पारंपरिक डांबराऐवजी जिओ पॉलिमर टेक्नो पॅच, एम-६० काँक्रीट विथ हार्डनर आणि प्रिकास्ट पॅनेल या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येत आहे. विशेष म्हणजे दुरुस्ती केलेला रस्ता अवघ्या ३० ते ४५ मिनिटांत वाहतुकीसाठी खुला करता येणार आहे. चाकण परिसरातील रस्ते व पायाभूत सुविधांच्या कामांमध्ये समन्वय राहावा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. एमआयडीसी, पीएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमएसएसआयडीसी यांच्यात समन्वय साधण्याची जबाबदारी समितीकडे देण्यात आली आहे. केवळ खड्डे बुजविण्यापुरते काम मर्यादित न ठेवता चाकण परिसरातील सुमारे ३०० ते ४०० किलोमीटर रस्त्यांसाठी कायमस्वरूपी एकात्मिक आराखडा तयार करण्यात येणार आहे. यात रस्त्यांचे काँक्रीटीकरण, स्टॉर्म वॉटर ड्रेनेज, पदपथ आणि पथदिव्यांची व्यवस्था करण्याचा समावेश आहे. चाकण हा राज्यातील महत्त्वाचा औद्योगिक परिसर असून उद्योगांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. उद्योग बाहेर जाऊ नयेत आणि स्थानिक तरुणांचा रोजगार टिकून राहावा, यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

# बाभुळवंडीत बोगस डॉक्टरचा गोरखधंदा उघड

## पदवी नसताना रुग्णांवर उपचार; २.८७ लाखांचा औषधसाठा जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अकोले** : तालुक्यातील आदिवासी भागातील बाभुळवंडी येथे कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना रुग्णांवर उपचार करून औषधे, गोळ्या व इंजेक्शन देणाऱ्या कथित बोगस डॉक्टरचा प्रकार आरोग्य विभागाच्या पथकाने उघडकीस आणला. आशा सेविकेच्या घरातच ही कथित वैद्यकीय दुकानदारी सुरू असल्याचे कारवाईत समोर आले. पथकाने छापा टाकून सुमारे २ लाख ८७ हजार रुपयांचा औषधसाठा व वैद्यकीय साहित्य जप्त केले.

या प्रकरणी बिश्वजीत पोटुळ बिश्वास (वय ४३, मूळ रा. धारली उत्तरपारा, जि. नदिया, पश्चिम बंगाल, सध्या रा. पिंपरकणे, ता. अकोले) याच्याविरुद्ध राजूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्याला अटक करून न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शामकांत शेटे यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक किशोर पवार, विस्तार अधिकारी यशोदा थोरात व शासकीय पंचांच्या पथकाने बाभुळवंडी येथे कारवाई केली. संबंधित व्यक्तीच्या राहत्या ठिकाणाची झडती घेतली असता रुग्ण तपासणीचे साहित्य, विविध इंजेक्शने, गोळ्या, सिरप व अन्य वैद्यकीय साहित्य आढळून आले.

याप्रकरणी डॉ. शेटे यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहितेतील कलम ३१८ (४), ३१६ (२) तसेच वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ मधील कलम ३३ (२), ३४ व ३६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आशा सेविकेच्या घरात कथित बोगस उपचार सुरू असल्याचे समोर आल्याने संबंधित आशा सेविकेविरुद्ध आरोग्य विभागाकडून काय कारवाई केली जाते, याकडे लक्ष लागले आहे. पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल सुनील रत्नपारखी व सचिन शिंदे करीत आहेत.

# वृद्धेश्वर परिसरातील स्वयंभू शिवलिंगे

**शिवदास मरकड | राष्ट्र सह्याद्री**




**तिसगाव** : श्रावण महिना हा अत्यंत पवित्र, मंगलमय आणि भक्तीपूर्ण मानला जातो. हा महिना पूर्णपणे भगवान शिवाला समर्पित आहे. शिवभक्तांच्या दृष्टीने या महिन्याला विशेष महत्त्व आहे. नाथ संप्रदायाची जन्मभूमी असलेल्या श्री क्षेत्र वृद्धेश्वर परिसरात गर्भगिरी डोंगर दर्यात अनेक शिवलिंगे स्वयंभू अवस्थेत असून, मच्छिंद्रनाथ व कानिफनाथांची येथे उपासना चालते. प्रत्येक स्थानाला वेगळे महत्त्व आहे. दोन्ही नाथांच्या संजीवन समाधीसह या शिवलिंगांचे दर्शन, बेलपूजा काशीयात्रेसमान मानली जाते .

**१.वृद्धेश्वराचे शिवलिंग** : नाथ संप्रदायाचे आद्य दैवत म्हणून श्रीक्षेत्र वृद्धेश्वर या स्थानाची ओळख आहे .या ठिकाणी स्वयंभू विशाल असे शिवलिंग असून .महाशिवरात्रीच्या दिवशी शिवपिंड गव्हाच्या आकाराएवढी वाढते, म्हणजेच वृद्धिंगत होते, अशी भाविकांची धारणा आहे. वृद्धेश्वराच्या शिवलिंगातून अखंड पाणी वाहते भाविकभक्त याला गंगेची धार मानतात. हे दहाव्या शतकातील मंदिर असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील गर्भगिरी डोंगराच्या कुशीत वसलेले श्री क्षेत्र वृद्धेश्वर हे एक जागृत स्वयंभू देवस्थान आहे. नवनाथांनी येथे यज्ञ केला व त्यावेळी महाप्रसाद (भंडारा) आयोजित केला होता. त्याप्रसंगी भगवान शंकर एका म्हाताऱ्याचे (वृद्धाचे) रूप धारण करून आले आणि त्यांनी सर्व देवतांना भोजन वाढले, म्हणून या म्हातारदेव किंवा वृद्धेश्वर म्हणून या स्थानाची ओळख आहे .वृद्धेश्वर या ठिकाणी आयुर्वेदिक वनस्पती खूप आढळतात .

**२.उत्तरेश्वर शिवलिंग** : पाथर्डी-नगर रस्त्यावर करंजी या गावी राष्ट्रीय महामार्गाच्या कडेला गावाच्या मध्यभागी उत्तरेश्वराचे स्थान आहे. गेल्या पाच वर्षांपूर्वी अत्यंत आकर्षक असे दाक्षिणात्य पद्धतीचे भव्य मंदिर व रंगकाम पूर्ण झाले. महायज्ञाच्या वेळी नाथांनी भगवान शिव शंकराला निमंत्रित केल्यावर शिव-पार्वती या स्थानावर प्रकट झाले. महादेव उत्तर दिशेकडे तोंड करून बसल्याने उत्तरेश्वर नावाने प्रसिद्ध झाले.

**३.ढोलेश्वर शिवलिंग** : उत्तरेश्वरापासून पूर्वेला तीन किलोमीटर सातवड गावच्या शिवारात विस्तीर्ण अशा वडाच्या झाडाखाली शिवलिंग आहे . वृद्धेश्वर येथे झालेल्या यज्ञकाळात सात ऋषीमुनीसह तेहतीस कोटी देवता याठिकाणी उपस्थित होते .निद्रा अवस्थेत असलेल्या देवतांना जागे करण्यासाठी शिव शंकराने येथे ढोल ( नगारा ) वाजवला त्यामुळे या स्थानाला ढोलेश्वर हे नाव प्राप्त झाले . तसेच या गावांमध्ये यज्ञ काळात सप्तऋषी यांनी या शिवलिंगाची आराधना केल्याने गावाचे नाव सातवड असे पडले अशी भाविकांची श्रद्धा आहे .

**४.कंचनेश्वर शिवलिंग** : ढोलेश्वरपासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर कंचनेश्वर नावाचे जागृत देवस्थान आहे. गोरक्षनाथांनी या ठिकाणी पूजा करून संपूर्ण गर्भगिरी डोंगर सोन्याचा व्हावा, यासाठी प्रार्थना केली. हे स्थान नदीकिनारी असून, घाटशिरस गावाच्या हद्दीत आहे. परिसरात भिल्लवस्ती मोठी आहे.

**५.वाघेश्वर शिवलिंग** : वाघदरा हे स्थान शेडाळा (ता. आष्टी) परिसरात आहे. डोंगर कड्याबर व परिसरात रम्य धबधबे, ओढे मोठ्या प्रमाणावर आहेत. माता पार्वतीन या ठिकाणी शिव शंकराची आराधना केली आहे. वाघेश्वर मंदिरापुढे पार्वती माताचे मंदीर असून वाघेश्वर शिवलिंग मंदिराची येथे जीर्णोद्धार काम नुकतेच पूर्ण झाले. पूर्वी या स्थानी हिस्त्र पशुंचे वास्तव्य होते. येथील दाट झाडी मन मोहून टाकते.

**६.आपेश्वर शिवलिंग** : नाथ पूजास्थान अपेश्वर मंदीर श्री क्षेत्र मढी येथील पवनागिरी नदी किनारी आपेश्वर नावाने हे शिवलिंग प्रचलित असून येथे कानिफनाथांनी या शिवलिंगाची पूजा केली आहे .शिवलिंगाच्या पूजेसाठी नाथांनी स्वहस्ते मंदिराजवळ पाण्याचा कुंड निर्माण केला आहे .त्यामुळे या स्थानाला नाथपूजा स्थान असे म्हणता.आप्पा नावाचे शिवभक्तांने या शिवलिंगाची पूजा केली त्यामुळे शिवभक्त आपेश्वर या नावाने या नावाने ओळखू लागले .

**७.अमृतेश्वर शिवलिंग** : श्री क्षेत्र मढीच्या दक्षिणेस गर्भगिरी डोंगरात मच्छींद्रनाथ गडाच्या पायथ्याशी पवनागिरी नदीच्या पवित्र पात्रात हे खडाकावर अमृतेश्वराचे स्वयंभू शिवलींग आहे. या शिवलींगाजवळ गोमुखातून सतत पाणी पडते, नंदीजवळही सतत पाण्याचा स्त्रोत असतो. या ठिकाणी पवनागिरी नदीचे उगमस्थान आहे. हिरव्या गर्द झाडीतून, उंच डोंगराच्या कुशीतून काळ्याभोर खडकावरून, मोत्यासारखं स्वच्छ पाणी घेऊन या खडकातील शिवलिंगातून अखंड गंगा प्रवाहीत होते. हे अमृतमय कृपा दृष्टी असणारे शिवलींग असल्याने या शिवलींगाचे नाव 'अमृतेश्वर' असे आहे .

याशिवाय पाथर्डी तालुक्यात तिसगाव येथील बाजार तळ्यातील स्वयंभू शिवमंदिर ,मढी येथील सिद्धेश्वर ,मढी पाथर्डी रोडवर वनदेव, पाथर्डी येथील तपनेश्रवर श्वर, खोलेश्वर, पिनाकेश्वर, संगमेश्वर आदी जागृत शिव मंदिरे आहेत.

# शनीशिंगणापुरात गुटखा-पानमसाला विक्रेत्यावर पोलिसांची कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई/शनीशिंगणापूर** : शनीशिंगणापूर परिसरात अवैधरीत्या तंबाखूजन्य पदार्थ व सुगंधित पानमसाल्याची विक्री करण्याच्या उद्देशाने साठा करून ठेवणाऱ्याविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली. या कारवाईत विविध प्रकारचा तंबाखू व पानमसाला असा एकूण २१ हजार ४८८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईनंतर संबंधित आरोपी फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. शनीशिंगणापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चारी क्रमांक ४ परिसरात रविवारी (दि. २३ ऑगस्ट) सकाळी सव्वा अकराच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार संबंधित ठिकाणी छापा टाकून झडती घेण्यात आली. या झडतीमध्ये V-1 TOBACCO Mo 14 पुडे, V-1 BIG TOBACCO Mo 27 पुडे तसेच केसरयुक्त विमल पानमसाल्याचे ४३ पुडे आढळून आले. या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत २१ हजार ४८८ रुपये असल्याचे पोलिसांनी दाखल केलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे. याप्रकरणी अनिल माधव वाघ (रा. तिरमल वस्ती, चारी क्रमांक ४, शनीशिंगणापूर) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १२३, २२३, २७४ व २७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हेड कॉन्स्टेबल विशाल अण्णासाहेब तनपुरे यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. पुढील तपास शनीशिंगणापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गिरीष केदार करीत आहेत. या कारवाईमुळे शनीशिंगणापूर परिसरात अवैध तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# ओंकार शुगर ग्रुपला 'उद्योग उत्कृष्टता पुरस्कार'



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : साखर उद्योगाच्या विकासातील उल्लेखनीय योगदान, व्यावसायिक उत्कृष्टता, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि शाश्वत विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ओंकार शुगर ग्रुपला 'उद्योग उत्कृष्टता पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. नवी दिल्ली येथील भारतीय साखर तंत्रज्ञ संघटनेच्या वतीने गोवा येथे १८ ते २० ऑगस्टदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ८४ व्या वार्षिक अधिवेशन व आंतरराष्ट्रीय साखर प्रदर्शनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. ओंकार शुगर ग्रुपच्या वतीने संचालक ओमराजे बोत्रेपाटील यांनी पुरस्कार स्वीकारला.यावेळी साखर उद्योगातील विविध संघटनांचे पदाधिकारी, तज्ज्ञ, तंत्रज्ञ आणि मान्यवर उपस्थित होते. इथेनॉल निर्मिती, जैवऊर्जा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शाश्वत विकास तसेच उद्योगविस्ताराला प्राधान्य देत ओंकार शुगर ग्रुपने केलेल्या कामगिरीची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली.साखर उद्योगासमोरील बदलती आव्हाने लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, ऊर्जा निर्मितीतील नव्या संधी आणि पर्यावरणपूरक उत्पादन प्रक्रियांवर समूहाने भर दिला आहे. त्यामुळे या पुरस्काराने समूहाच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर एक नवी ओळख मिळाली आहे.या सन्मानाबद्दल अध्यक्ष बाबुराव बोत्रेपाटील, संचालक, अधिकारी, कर्मचारी, कामगार तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ओंकार शुगर ग्रुपचे अभिनंदन केले. उद्योगातील गुणवत्ता, आधुनिकता आणि शाश्वत विकासाचा ध्यास कायम ठेवत मिळालेला हा पुरस्कार समूहाच्या संपूर्ण टीमच्या मेहनतीचे फलित आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# गावठी कट्टा विकणारा तरुण एलसीबीच्या ताब्यात




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील एक तरुण दि. २० ऑगस्ट रोजी शनी शिंगणापूर येथे गावठी कट्टा विक्री करण्यासाठी गेला असता अहिल्यानगर येथील एलसीबी पथकाने सापळा लावून त्याच्या मुसक्या आवळून गावठी कट्टयासह त्याला ताब्यात घेतले. अहिल्यानगर जिल्हा पोलीस प्रमुख मुम्मका सुदर्शन व एलसीबी पथकाचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक संदिप दरवडे, पोलीस अंमलदार अरूण गांगुर्डे, अशोक लिपणे, भगवान सानप, किशोर शिरसाठ, प्रशांत राठोड व महादेव भांड आदि पोलिस पथक दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी शनि शिंगणापूर पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली कि, एक तरुण गावठी कट्टा विक्री करण्यासाठी येत आहे. खबर मिळताच पोलीस पथकाने शनी शिंगणापूर येथील हॉटेल ब्लू ऑरगॅनिक रसवंती सेंटर जवळ सापळा लावून एका तरुणाला गावठी कट्टा व दोन जिवंत काडतूसा सह ताब्यात घेतले. पथकाने त्याला पोलिसी खाक्या दाखवताच त्याने त्याचे नाव अनिल सिताराम सावंत, रा. ब्राम्हणी, ता. राहुरी, असे सांगीतले. तसेच त्याने सदर कट्टा राहुरी तालुक्यातील वळण पिंप्री येथील गणेश शहाराम शिंदे याच्याकडून विकत घेतल्याचे सांगीतले. आरोपी अनिल सिताराम सावंत, वय ३० वर्षे, रा. ब्राम्हणी व गणेश शहाराम शिंदे, रा. वळण पिंप्री, ता. राहुरी या दोघांवर विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. फरार असलेला गणेश शहाराम शिंदे याचा शोध पोलीस पथकाकडून सुरु आहे.